मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
www.rajdand.com
। पश्चिम महाराष्ट्र ।
२५ वर्षे विश्वासार्हतेची
follow us : /rajdandlive
RNI Regd. No. 72105/99 ⁕ वर्ष २५ ⁕ अंक २०० ⁕ सातारा ⁕ शुक्रवार, दि. २९ मार्च २०२४ ⁕ पाने ६ (सुप्रभात) ⁕ किंमत ५/– रूपये

## दिलीप वळसे पाटील यांचा अपघात, हात फ्रॅक्चर

**पुणे :** मंत्री दिलीप वळसे पाटील यांचा अपघात झाला आहे. घरातच पाय घसरुन पडल्यानं त्यांना दुखापत झाली आहे. वळसे पाटील यांच्या खुब्याला मार आणि हाथ फ्रॅक्चर झाला आहे. पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात येणार आहे. याच रुग्णालयात त्यांच्यावर शस्त्रक्रिया पार पडणार आहे. लोकसभेच्या निवडणुकीत त्यांची महत्वाची भूमिका आहे. मात्र ऐन लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडवरच त्यांचा अपघात झाला आहे.

# खटाव तालुक्यात वादळासह अवकाळी पाऊस; घरासह शाळेचे पत्रे उडाले





खटाव तालुक्यातील धोंडेवाडी येथील जिल्हा परिषद शाळा व घरांची झालेली पडझड. घराकडे हताश नजरेने बघताना नागरिक. (छाया – अजित जगताप, वडूज)

**राजदंड / वडूज**

**खटाव तालुक्यामध्ये दुष्काळसदृश परिस्थिती आहे, पण गुरुवारी सायंकाळी अचानक सुटलेल्या वादळी वारा व पावसाने शाळेच्या खोल्यांची पत्रे उडाली व अनेक घरांची पडझड झाली आहे.**

धोंडेवाडी येथे चक्रीवादळसह पावसात जिल्हा परिषद केंद्र शाळा धोंडेवाडीसह घरांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सायंकाळी ५ ते ५ वाजून ४० मिनिटांनी अचानक कोसळणाऱ्या पावसामुळे लोकांची दैना उडाली. मात्र, सकाळची शाळा असल्यामुळे फार मोठी हानी झाली नाही.

शाळेच्या वरंडयासह पाच खोल्या व गावातील काही घरांची पडझड झाली . विजेच्या धक्यानेएका शेळीचा जागेच मृत्यू झाला. शाळेचे इलेक्ट्रॉनिक वस्तू, पाच एल ई डी टीव्ही, चार पंखे, एक कॉम्प्युटर, अन्न धान्य, शाळेचे ढोल ताशे, सोलर इन्व्हर्टर पूर्णपणे खराब झाले आहेत.

घटनास्थळी सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामसेवक, तलाठी व गावकरी यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा काम सुरु केले आहे. रात्री गावातील विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे पंचनामा करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या उद्या सकाळी सर्व ग्रामस्थांशी चर्चा करून पंचनामे करून त्यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांनी केलेली आहे. आचारसंहिताचे कोणताही भाव न करता गोरगरीब शेतमजूर व शेतकरी यांना जास्तीत जास्त मदत करावी. अशी धोंडेवाडी ग्रामस्थ हनुमंत भोसले व कृणाल गडांकुश, मुकुंद माने व संजय जगताप यांनी केली आहे.

## पुण्यातील कसबा पेठेतील भागात कलम १४४ लागू

**राजदंड / पुणे**

पुण्येश्वर मंदिर आणि छोटा शेख सल्ला दर्ग्यावरुन काही दिवसांपूर्वी पुण्यात मोठा वाद झाला होता. त्यामुळं कसबा पेठेत तणाव वाढला होता. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस सहआयुक्त यांनी पवळे चौक ते कुंभार वेस चौक दरम्यान १४४ (१) कलम लागू करण्यात आले आहे. तसंच, सध्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

सध्या राज्यात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलिस सहआयुक्त प्रवीण पवार यांनी जातीय तेढ निर्माण करणाऱ्या व कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्या कोणत्याही कारवायांना आळा घालण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळं पवळे चौक ते कुंभार वेस चौक, भोई गल्ली, कागडीपुरा, कुंभारवाडा, आलोकनगर सोसायटी आणि अग्रवाल तालीमसह ठिकाणी कलम १४४ लागू करण्यात आले आहे.

कलम १४४ लागू करण्यात आलेल्या ठिकाणांबाहेर राहणाऱ्या व्यक्तींना वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती वगळता धार्मिक विधी किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. समाजात सलोखा राखण्यासाठी या उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. धार्मिक भावना दुखावणारी किंवा आंतरगट संघर्ष भडकावणारी कोणतीही कृती किंवा वक्तवे रोखण्यासाठी नियम निश्चित्त करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अफवा पसरवणे, सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर पसरवणे, पूर्वपरवानगीशिवाय सार्वजनिक मेळावे घेणे, कार्यक्रमाचे आयोजन करणे, या सर्वावर १० एप्रिल २०२४पर्यंत निर्बंध लावण्यात आले आहेत.

## दिल्लीच्या तख्तासमोर न झुकण्याची प्रेरणा किल्ले शिवनेरीवर मिळते : डॉ. अमोल कोल्हे



**राजदंड न्यूज नेटवर्क/पुणे**

दिल्लीच्या तख्तासमोर न झुकण्याची प्रेरणा किल्ले शिवनेरीवर मिळते, असे खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले.

शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर डॉ. कोल्हे यांनी आज शिवनेरीवर दर्शन घेतले. त्यावेळी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचीही त्यांनी भेट घेतली. वयस्कर व्यक्तीला वाकून नमस्कार करणे ही संस्कृती आहे, असेही डॉ. कोल्हे म्हणाले. म्हणून की आढळराव पाटील यांना नमस्कार केला, ही संस्कृती जपली पाहिजे लढण्यासाठी ताकद द्या, सर्वसामान्य नागरिकांसाठी लढण्याची प्रेरणा द्या, हेच आज शिवनेरीवर नतमस्तक होताना मागणं मागितल्याच त्यांनी यावेळी सांगीतलं.

त्यांची एक जरी वारी आढळरावांनी दिल्लीला कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी झाली असती तर समाधान वाटलं असत. आक्रोश मोर्चाची त्यांची टिंगल त्यांनी केली नसती तर बरं वाटलं असत. धोरणात्मक टीका व्हायला हवी, वैयक्तिक टीका, व्यावसायिक कामाविषयी की टीका करणार नाही, पण धोरणात्मक टीका होणारच आहे. समोरासमोर बसून चर्चा करु पाच वर्षात मी काय केलं यावर बोलू. २०१९ ची निवडणूक मी शरदचंद्र पवार यांच्या आशीर्वादाने केली आणि आताही तेच करतोय, माझ्या भूमिकेत कुठं बदल झालाय का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शिरूर सह इतर मतदारसंघात ही मला लक्ष देता येतय. तुम्ही मोहिते पाटील म्हणताय यावर शिरूरच्या लोकांचा गैरसमज होईल. विजयसिंह मोहिते पाटील आणि माझे जुने ऋणानुबंध आहेत. मी खूप सर्वसामान्य कुटुंबातला कार्यकर्ता आहे.

**शरद पवार यांचा विचार भारी पडतोय!**

किल्ले शिवनेरीवर डॉ. अमोल कोल्हे आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांची भेट झाली. त्यावेळी डॉ. कोल्हे यांनी आढळराव पाटील यांच्या पाया पडत त्यांना नमस्कार केला. राजकारणात वैयक्तिक टीका न करता धोरणात्मक टीका जरुर करणार आहे. वयस्कर माणसांना नमस्कार करणं ही आपली संस्कृती आहे. किल्ले शिवनेरीवर खासदार डॉ. अमोल कोल्हे नतमस्तक होण्यासाठी आले असताना एका चिमुकल्याने त्यांना छत्रपती शिवाजी महाराज मालिकेतील संवाद म्हणून दाखवला.

## मी उमेदवार! माझ्याशी भिडा, वडिलांवर काय टीका करता...

### काँग्रेसच्या प्रणिती शिंदे सातपुतेंवर कडाडल्या



**राजदंड / पुणे**

उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथे शरद चंद्र पवार राष्ट्रवादी गटाचे जिल्हाध्यक्ष काका साठे यांनी मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, कार्याध्यक्ष नंदकुमार पवार, जयदीप साठे, प्रल्हाद काशीद यांच्यासह कार्यकर्ते, महीला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मागील दोन दिवसात भाजपचे उमेदवार राम सातपुते यांनी सुशीलकुमार शिंदे यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. त्या मुद्द्याला धरून प्रणिती शिंदे यांनी भाषणात भाजपवर हल्लाबोल केला.

त्या म्हणाल्या, आज या ठिकाणी प्रचंड महिला उपस्थित आहेत, कारण हा काँग्रेस राष्ट्रवादीचा मेळावा आहे, इकडे त्यांना सुरक्षित वाटते, देशातील राजमाता जिजाऊ, माता सावित्री, माता रमाई यांनी दिलेले जे संस्कार आहेत तेच संस्कार काँग्रेस राष्ट्रवादीने पुढे नेले आहेत आणि मी आमदार म्हणून उभी आहे. आज मी आणि सुप्रिया ताई लढत आहोत, भिडत आहोत, या संविधान विरोधी राक्षसी शक्तीच्या विरोधात, आणि आमचे दोघींचे वडील वणवण फिरत आहेत, पक्षासाठी फिरत आहेत.

माझ्या वडिलांवर का टिका करता माझ्यावर टिका करा ना, तुमच्या विरोधात मी उमेदवार आहे, मला भिडा ना, पराभव समोर दिसू लागल्याने पायाखालची वाळू सरकली आहे तुमच्या, एवढा संघर्ष माझ्या वडीलांनी केला, त्याना बोलताना काहीच वाटत नाही.

त्या पुढे म्हणाल्या, हे आपल्या खोट्या गरीबीचा दाखला देत म्हणत फिरतात अब राजा का बेटा राजा नही बनेगा, जो काबिल है वही बनेगामग सोलापुरात केलेल्या लोक हिताच्या कामां बद्दल बोला आणि लोकांना ठरवू द्या कोण काबिल आहे ते. प्रारंभी प्रास्ताविक जयदिप साठे यानी केले. यानंतर प्रल्हाद काशिद अभिजीत पाटील यांची भाषणे झाली.

## महायुतीमध्ये आम्ही नाराज, पुढील तीन दिवसांत निर्णय घेऊ

### रामदास आठवलेंचा इशारा

**राजदंड / पुणे**

महायुतीमध्ये असूनही आम्हाला राज्यात मंत्रिपद देण्यात आलेले नाही. लोकसभेच्या दोन जागा आम्ही मागितल्या आहेत, मात्र साधे चर्चेलाही बोलाविले जात नाही. त्यामुळे महायुतीमध्ये आम्ही नाराज आहोत. पुढील दोन-तीन दिवसांत पुढील भूमिका घेऊ, असा इशारा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पुण्यात दिला. रिपाइं (आठवले गट) पक्षाची राज्य कार्यकारिणीची बैठक पुण्यात गुरुवारी झाली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत आठवले बोलत होते.

आठवले म्हणाले, राज्य सरकरच्या शासकीय कार्यक्रमात माझा फोटो कुठेही लावला जात नाही. आमच्या कार्यकर्त्यांना कुठेही विश्वासात घेतले जात नाही. आंध्र, तामिळनाडू, आसाम या ठिकाणी आम्ही स्वतंत्र लढत आहोत. आम्ही ज्यांच्या सोबत जातो, ते सत्तेत येतात. सोलापूरच्या जागेसाठी आम्ही आग्रही होतो. त्याठिकाणी आमचा उमेदवार तयार होता. मात्र, भाजपने उमेदवार जाहीर केला. मला महाविकास आघाडीची ऑफर होती, पण मी नाकारली. महाविकास आघाडीचे अनेक नेते माझ्या संपर्कात होते.

आजच्या बैठकीत आमच्या पक्षाला दोन महामंडळ, एक विधानपरिषद सदस्य, विधानसभा निवडणुकीत ४० जागा आणि लोकसभेला दोन जागा आम्हाला हव्या आहेत.

## शिवसेना शिंदे गटाची पहिली यादी जाहीर

### मावळमधून श्रीरंग बारणे यांना लोकसभेचे तिकिट



**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाने लोकसभा निवडणुकीसाठी आपली पहिली यादी जाहीर केली आहे. एकूण नऊ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. मात्र या पहिल्या यादीत कल्याण लोकसभेचे विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे आणि यवतमाळ-वाशिम लोकसभेसाठी कुणाचेही नाव जाहीर केलेले नाही, त्यामुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघ सध्या शिंदे गटाकडे आहे. श्रीकांत शिंदे यांनी काही दिवसांपूर्वीच विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांची उमेदवारी जाहीर केली होती. मात्र नाशिकच्या जागेचाही पहिल्या यादीत उल्लेख नसल्यामुळे हा मतदारसंघ भाजपा किंवा राष्ट्रवादीच्या पारड्यात गेला आहे का? अशी शंका घेतली जात आहे.

शिवसेनेच्या फुटीनंतर रामटेकचे खासदार कृपाल तुमाने शिंदे गटात आले असले तरी जिल्ह्यातील अनेक शिवसैनिक मात्र ठाकरे गटासोबतच असल्याने तुमाने यांच्यासमोरील अडचणी वाढल्या होत्या. रामटेक लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जातो. येथून विद्यमान खासदार कृपाल तुमाने दोनदा विजयी झाले आहेत. एकनाथ शिंदे यांनी बंडानंतर शिवसेनेत उभी फूट पडली. त्यावेळी प्रारंभी तळ्यात-मळ्यात भूमिका घेणारे कृपाल तुमाने नंतर शिंदे गटासोबत गेले. काही दिवसांपूर्वीच उमरेडचे आमदार राजू पारवे यांना शिवसेना शिंदे गटात प्रवेश देण्यात आला होता. त्यानंतर आज शिंदे गटाने अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या या मतदारसंघासाठी राजू पारवेंना उमेदवारी दिली आहे.

### कोण आहेत शिंदे गटाचे उमेदवार?

- राहुल शेवाळे – मुंबई दक्षिण मध्य
- संजय मंडलीक – कोल्हापूर
- सदाशिव लोखंडे – शिर्डी (अनुसूचित जाती)
- प्रतापराव जाधव – बुलढाणा
- हेमंत पाटील – हिंगोली
- श्रीरंग बारणे – मावळ
- राजू पारवे – रामटेक (अनुसूचित जाती)
- धैर्यशिल माने – हातकणंगले

## पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे यांचे बंड झाले थंड?



**राजदंड / पुणे**

बारामती लोकसभा निवडणूक लढविण्याची घोषणा करून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटणारे पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे निवडणुकीतून माघार घेण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'वर्षा' बंगल्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत पुरंदरचे प्रश्न सोडविण्याचे आणि पुरंदरला निधी देण्याचे आश्वासन मिळाल्यामुळे शिवतारे माघार घेणार असल्याची चर्चा आहे. दरम्यान, ते यासंदर्भातील भूमिका लवकरच जाहीर करणार आहेत.

बारामती कोणाचा सातबारा नाही, असे सांगत विजय शिवतारे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची घोषणा काही दिवसांपूर्वी केली होती. महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्यावरही त्यांनी कडवट टीका केली होती. त्यामुळे शिवतारे यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समज दिली होती. मात्र कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन १ एप्रिल रोजी जाहीर सभा आणि १२ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे शिवतारे यांनी जाहीर केले होते. त्यांच्या या कृतीचे महायुतीमध्येही तीव्र पडसाद उमटले होते. त्यामुळे शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा दिला होता. तसचे शिवतारे करत असलेल्या आरोपांवर अजित पवार यांनी बोलणे टाळले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याबबाबत भूमिका घेतली, त्यांना समजावून सांगतिल, असे पवार यांनी स्पष्ट केले होते.

या पार्श्वभूमीवर बुधवारी रात्री स्वतंत्र बैठक झाली. त्यामध्ये शिवतारे यांनी उपस्थित केलेले मुद्दे, प्रश्न समजावून घेण्यात आले. पुरंदरच्या विकासासाठी निधी देण्याचे आश्वासनही शिवतारे यांना देण्यात आले. ही भूमिका शिवतारे यांनाही मान्य झाल्याने त्यांनी माघार घेण्याची तयारी दर्शविल्याची चर्चा आहे.

## मनरेगाच्या मजुरांसाठी खुशखबर! मोदी सरकारने वाढवले वेतनाचे दर

**नवी दिल्ली :** 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने' (मनरेगा) अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना केंद्र सरकारने मोठी भेट दिली आहे. सरकारने मनरेगाच्या मजुरीच्या दरात ३ ते १० टक्के वाढ केली आहे. यासंदर्भातील अधिसूचना आज जाहीर करण्यात आली. लोकसभा निवडणुकीपूर्वी वाढलेले वेतन दर २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी आहेत. मनरेगा कामगारांसाठी १ एप्रिल २०२४ पासून नवीन मजुरी दर लागू होतील.

नव्या दरांनुसार आता प्रत्येक राज्यातील कामगारांना जास्त वेतन मिळणार आहे. गोव्यात मजुरीच्या दरात सर्वाधिक वाढ करण्यात आली आहे. गोव्यात सर्वाधिक १०.५६ टक्के वाढ झाली आहे. तर उत्तर प्रदेशात केवळ ३.04 टक्के वाढ झाली आहे.

**काय आहेत नवे दर?**

गोव्यातील कामगारांना पूर्वी ३२२ रुपये प्रतिदिन मिळत होते, ते आता वाढून ३५६ रुपये झाले आहे.

कर्नाटकात मनरेगाचा दर ३४९ रुपये झाला आहे, जो पूर्वी ३१६ रुपये प्रतिदिन होता.

मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमधील मनरेगा कामगारांचा मजुरी दर २२१ रुपयांवरून २४३ रुपये प्रतिदिन झाला आहे. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमधील मजुरांची रोजची मजुरी २३० रुपयांवरून २३७ रुपये झाली आहे.

हरियाणा, आसाम, मणिपूर, अरुणाचल प्रदेश, नागालँड, राजस्थान, केरळ आणि लक्षद्वीपमध्ये मनरेगा कामगारांचे दर ७ टक्क्यांनी वाढले आहेत. आता त्यांची रोजची मजुरी २६७.३२ रुपयांवरून २८५.४७ रुपये झाली आहे.

# सातारा जिल्ह्यातील क्षयरोगाची वाटचाल मुक्तीकडे

**अजित जगताप**






जागतिक क्षय दिन साजरा झाल्यानंतर माहिती देताना अधिकारी वर्ग. ( छाया : निनाद जगताप, सातारा)

**राजदंड / सातारा**

सातारा जिल्ह्यामध्ये विविध रोगाचे प्रमाण कमी असून सातारा जिल्हा हा क्षयरोग मुक्तीच्या दिशेने वाटचाल करू लागले आहे. २४ मार्च हा दिवस जगभर जागतिक क्षय दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सातारा जिल्ह्यात आढावा घेण्यात आला.

सातारा जिल्ह्याची सरासरी लोकसंख्या ३२ लाखापेक्षा जास्त असून दरवर्षी सातारा जिल्ह्यामध्ये तीन हजार पेक्षा जास्त क्षय रुग्णांना उपचार दिला जातो. यापैकी चौदाशे पेक्षा जास्त रुग्ण थुंकी मुळे प्रभावित क्षय रुग्ण होतात. .शहर रुग्णांमधील साधारण ६ टक्के प्रमाण मृत्यूची आहे. रुग्णाचे बरे होण्याचे प्रमाण ८५ टक्के असून ते शंभर टक्के करण्यासाठी उपाय योजना सुरू करण्यात आलेली आहे. हवेतून पसरवणारा क्षय रोग असल्याने या आजाराची जंतू कोणाच्याही शरीरात प्रवेश करू शकतात. क्षयरोग व फुफ्फुसा व्यतिरिक्त क्षयरोग असे रोगाचे दोन प्रकार आहेत.

दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला, हलकासा सायंकाळी वाढणारा ताप, भूक मंदावणे, छातीत दुखणे, काही गंभीर रुग्णांच्या बेडक्यातून रक्त पडणे. वजन कमी होणे. तसेच एचआयव्ही , मधुमेह रुग्णांमध्ये एका दिवसाच्या खोकला देखील हे रोगाचा असू शकतो. मानेवर सूज व गाठी येतात. कधी कधी यामधून पू बाहेर येतो. डोकेदुखी, ताप, मानेचा ताटपणा इत्यादी याच रोगाची लक्षणे आढळतात.

सातारा जिल्ह्यात ६२ ठिकाणी सूक्ष्मदर्शक केंद्र आहेत. त्या माध्यमातून तपासणी केली जाते. सातारा जिल्ह्यामध्ये सातारा, पाचगणी व कराड या ठिकाणी तपासणी करून औषध उपचार दिला जातो. सरकारी उपचार केंद्र ,खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांकडेही उपचार करणाऱ्यांना संपूर्ण माहिती जिल्हा क्षय उपकेंद्र सातारा या कार्यालयात देणे बंधनकारक केलेले आहे. जर माहिती देण्यात टाळताळ केली तर कलम २६९ व २७० अंतर्गत वैद्यकीय व्यवसाय कारवाई होऊ शकते. अशी माहिती देण्यात आली. क्षयरोग हा सरकारी दवाखान्यात सहा ते नऊ महिन्याचे उपचार नंतर पूर्णपणे बरा होतो. अखंडी औषध उपचारामुळे रुग्णांना बरा होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. खोकताना किंवा शिंकताना तोंडावर आठवणीने रुमाल ठरवा इतर कुठे थुंकू नये. त्यामुळे इतरांना त्रास होऊ शकत नाही असे सांगण्यात आले.

या पत्रकार परिषदेला डॉक्टर समीर टकले, डॉक्टर दीपक कुऱ्हाडे ,डॉक्टर माधवी कुऱ्हाडे तसेच जिल्हा क्षय केंद्रात काम करणारे तानाजी मदने, पी.जी साखरे, ऋषिकेश बारटक्के, सचिन जंगम यांचे खूप मोठे योगदान आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर युवराज करपे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपकेंद्र प्रभावीपणे काम करत असल्याबद्दल जेष्ठ पत्रकार अजित जगताप यांनी सर्वांचे आभार मानले तसेच पत्रकार रघुनाथ कुंभार यांनीही वैद्यकीय क्षेत्रातील आपल्या अनुभव कथन केला. या वेळेला जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी राहुल पवार ,विष्णु शिंदे उपस्थित होते.

# प्रियकरासह दोघांविरोधात अत्याचाराचा गुन्हा

**राजदंड / सातारा**

प्रियकर आणि तुझ्यातील शारीरिक संबंधांचे व्हिडिओ माझ्याकडे आहेत, ते व्हायरल करेन' अशी धमकी देत २२ वर्षीय येथील युवतीवर अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. तसेच प्रियकराने लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याचे युवतीने फिर्यादीत म्हटले आहे.

सप्टेंबर २०२३ ते दि. २२ मार्च २०२४ या दरम्यान हा प्रकार घडला.

सातारा शहर पोलीस ठाण्यात येथील एका युवतीने फिर्याद दिली असून, याप्रकरणी संकेत अशोक पवार, आकाश जाधव (रा. कारंडवाडी, ता. सातारा) यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, आकाश जाधव व फिर्यादी युवती यांच्यामध्ये विमल लॉज येथे झालेल्या शारीरिक संबंधांचे व्हिडिओ माझ्याकडे आहते. ते व्हिडिओ मी व्हायरल करेन अशी धमकी देवून संकेत पवार याने बागवनाडा गोडोली येथील त्याच्या मित्राच्या घरी नेवून वारंवार युवतीवर अत्याचार केला.

तसेच आकाश जाधव यानेही लग्नाचे आमिष दाखवून सप्टेंबर २०२३ मध्ये साताऱ्यातील विमल लॉज येथे इच्छेविरोधात शारीरिक संभोग केला, असे फिर्यादी युवतीने तक्रारीत नमूद केले आहे. सहायक पोलीस निरीक्षक अविनाश मते तपास करत आहेत.

# अपहरण केलेल्या अल्पवयीन मुलीस बिहारमधून परत आणले

## लोणंद पोलिसांची मोठी कामगिरी

**राजदंड / लोणंद**

लोणंद पोलिसांनी एका अल्पवयीन अपहृत मुलीची बिहार राज्यात जावून शोध घेत अल्पवयीन मुलीसह आरोपीला परत आणण्यात यश मिळवले.


लोणंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काळज ,बडेखान, ता फलटण जिल्हा सातारा येथील चौदा वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीकडून अपहरण झाल्याची तक्रार लोणंद पोलीसात दाखल करण्यात आली होती. सदर प्रकरणी तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे सदर मुलगी बिहार राज्यात असल्याचे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम यांनी निष्पन्न केल्यानंतर पिडीत मुलगी ही बिहार राज्यात आरोपी गणेश माणिक अवघडे रा. गोंदवले ता. माण जि. सातारा सध्या रा. टाकळी हाजी ता. शिरुर जि. पुणे याचे सोबत असलेबाबत माहीती मिळाल्याने जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिक्षक राहुल धस यांची परवानगी घेऊन पोहवा सर्जेराव सुळ , पोकॉ. केतन लाळगे मपोकॉ. रुतुजा शिंदे यांचे पथक बिहार राज्यात पाठवण्यात आले. त्यांना सपोनि सुशिल भोसले व पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करत शोध घेवून पिडीत मुलगी ही दिनांक २४ रोजी दुपारी १२ वाजता आरोपी गणेश माणिक अवघडे याचेसह मिळुन आली. पिडीत मुलीस व आरोपीस बिहार येथुन डोळ्यात तेल घालुन तपास पथक यांनी लोणंद पोलीस स्टेशन येथे आणुन तपासी अधिकारी पोउनि विशाल कदम यांचे ताब्यात सुखरुप आणून दिले. लोणंद पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीबाबत सर्व स्तरातून कौतुकाची थाप मिळत आहे.

# श्री सद्गुरू यशवंत बाबा यात्रोत्सव नियोजन बैठक संपन्न

**राजदंड / मायणी**

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मायणी ता. खटाव गावचे दैवत श्री सद्गुरु यशवंत बाबा महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने दि. ३० मार्च ते ८ एप्रिल अखेर यात्रोत्सव व जनावरांच्या जंगी यात्रेचे आयोजन आले आहे. त्या निमित्ताने सदर यात्रेच्या नियोजनाची मीटिंग श्री सद्गुरु यशवंत बाबा मंदिरात संपन्न झाली. या यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी बंडा उर्फ गोरक्षनाथ माने यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

माजी जि.प.सदस्य व ट्रस्टचे खजिनदार सुरेंद्र गुदगे यांचे अध्यक्षतेखाली सदर बैठक संपन्न झाली .सदर वेळी यशवंत बाबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष काकासाहेब माने, उपाध्यक्ष आबासाहेब माने, सचिव द.ग.माने गुरुजी,विश्वस्त रणजीत माने ,उपसरपंच दादासाहेब कचरे, तंटामुक्तीचे अध्यक्ष प्रकाश कणसे ,मार्केट कमिटीचे संचालक स्वप्निल घाडगे, यशवंत विकास सोसायटीचे चेअरमन अनिल माळी, विजय माने ,सर्व ग्रामपंचायत सदस्य ,सुरेश कोळी ,महेश जाधव अरुण भिसे, नागेश यादव ,विजय शिंदे, मन्सूर भाई नदाफ, अभिजीत कचरे, दिनकर झोडगे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने पुढील प्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले - शनिवार ३० रोजी श्री सद्गुरु यशवंत बाबा महाराज पुण्यतिथी. रविवार ३१ पालखी व भंडारा. शुक्रवार ५ मुख्य रथ सोहळा. २८ मार्च ते ४ एप्रिल अखेर ज्ञानेश्वरी पारायण सोहळा.

यानिमित्ताने यात्रा कमिटी स्थापन करण्यात आली. या यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी बंडा उर्फ गोरक्षनाथ माने यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यामध्ये चेअरमन- गोरखनाथ माने उर्फ बंडा महाराज, व्हाईस चेअरमन-दत्तात्रय शिंदे, श्रीमंत घाडगे, सचिव-राजू बाबर, सहाय्यक सचिव- सागर पाटोळे ,खजिनदार -शंकर नायकुडे ,सहाय्यक खजिनदार -बाळासाहेब यलमर .या निमित्ताने भंडारा रथ सजावट मंदिर सजावट व दक्षता टिंब यांची स्थापना करण्यात आली दरम्यान धुळवडी दिवशी व्यापारांसाठी जागा वाटप करण्यात येणार आहे

यात्रेसंदर्भात मार्गदर्शन करताना सुरेंद्र गुदगे म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकांमुळे आचारसंहिता लागू झाली आहे. आचार संहितेच्या सर्व नियमांचे ग्रामपंचायतीने काटेकोरपणे पालन करावे. मायणीची जनावरांची यात्रा ही प्रसिद्ध आहे. जनावरांच्या यात्रेत लाखो रुपयांचे व्यवहार होत असतात. मात्र तथापि गेले काही वर्षे जनावरे न आल्याने ती बंद पडली आहे मात्र यात्रा कमिटीने बैल व गाय या प्रकारात पन्नास हजारांची बक्षीस योजना जाहीर करून पुन्हा बैलांची यात्रा भरावी यासाठी प्रोत्साहन द्यावे.

# बावधन ग्रामपंचायतीचे वीजबिल झाले 'झिरो'

- कार्यान्वित केला सौर ऊर्जा प्रकल्प, तालुक्यातील पहिलीच ग्रामपंचायत

**राजदंड / वाई**

ग्रामस्थांना मूलभूत सोयी सुविधा पुरवणे हे प्रत्येक ग्रामपंचायतीचे मुख्य काम!हे काम सगळेच करतात.पण कल्पकता आणि जिद्द असेल तर अनेक वेगळे उपक्रम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबवले जातात. बावधन ता वाई येथे सरपंच सौ शुभांगी कांबळे,उपसरपंच उदयसिंह पिसाळ ग्रामविकास अधिकारी प्रशांत धुमाळ आणि सहकाऱ्यांनी बावधन ग्रा. प. इमारतीचे वीज बिल चक्क झिरो केले आहे. यासाठी त्यांनी २ किलो वॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. अपारंपरिक ऊर्जास्तोत्राचा वापर करून आपल्या संस्थेच हित जोपासणाऱ्या संचालक मंडळाचे जिल्ह्यात कौतुक होत आहे.

बावधन वाई तालुक्यातील सर्वात मोठे अन राजकीय दृष्ट्या संवेदनशील गाव!या गावाने गेली अनेक वर्षे तालुक्याला नव्हे तर जिल्ह्याच्या राजकीय सामाजिक उपक्रमांचे प्रतिनिधीत्व केले.बावधन ग्रामपंचायतीमध्ये कारभार स्वीकारलेल्या सरपंच उपसरपंच सर्व सदस्य आणि नूतन ग्रामविकास अधिकाऱ्यांनी वेगळा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला.माझी वसुंधरा अभियान सुरू असल्याने त्याच्या माध्यमातून ग्रामपंचायतीने 'सोलर सिस्टीम'बद्दल सखोल अभ्यास करून त्याचे फायदे तोटे लक्षात घेतले.यासाठी 'के. के. सोलर'चे संचालक करण कदम यांचे मार्गदर्शन घेतले.

करण कदम यांच्या मार्गदर्शनातून ग्रामपंचायतीने २ किलो वॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प सुरू केला.त्यातून दरमहिना सुमारे २४० युनिट विजेची निर्मिती होणार आहे.या वीजनिर्मितीचा वापर वाणिज्य (कमर्शियल) असल्याने याला सरकारकडून अनुदान मिळत नाही.मात्र यापुढे बावधन ग्रामपंचायतीला वीजबिल झिरो येणार आहे. यामुळे बावधन ग्रामपंचायतीची दरमहा सुमारे २ ते ३००० रुपये बचत होणार आहे. ग्रामपंचायतीने या प्रकल्पातून उत्पादित झालेली वीज बावधन ग्रामपंचायत वापरणार असून वापरून शिल्लक राहिलेली शिल्लक वीज महाराष्ट्र वीज वितरण कंपनी विकत घेणार आहे. त्याचे बिल वीज कंपनी ग्रामपंचायतीला ठरलेल्या युनिट दराने देणार आहे. विशेष म्हणजे वीज वितरण कंपनी आणि ग्रामपंचायत बावधनचे वीज वितरण कंपनी मध्ये एक बँक खाते असणार आहे. यामध्ये ग्रामपंचायतीने उत्पादित केलेली वीज, वापरलेली वीज आणि शिल्लक वीज याचा हिशोब असणार आहे. याच हिशोबातून ग्रामपंचायती ला गरज पडेल तेव्हा वीज वितरण कंपनी स्वतःची पारंपरिक वीज देखील देणार आहे.

या सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ सौ. शुभांगी कांबळे, उपसरपंच उदयसिंह पिसाळ, वीज वितरण कंपनीचे अभियंता पंकज गोंजारी, उपअभियंता मर्ढेकर, सदस्य दिगंबर रासकर, विवेक भोसले, हनुमंत कांबळे, ग्रामविकास अधिकारी प्रशांत धुमाळ, के के सोलर चे संचालक करण प्रदीप कदम यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.




> “ अपारंपरिक ऊर्जा स्तोत्राचा वापर करून ग्रामपंचायतीची कायमस्वरूपी मासिक बचत करण्याचा आमचा मानस होता.या सोलर सिस्टीम ला २५ वर्षांची गॅरंटी असुन पुढील २५-३० वर्षे ग्रामपंचायतीचे आर्थिक ताण कमी करण्याचा आमचा हा उपक्रम आहे.लवकरच याच सोलर सिस्टीम वर आम्ही इलेक्टरीकल बाईक आणि चार चाकी वाहनांसाठी 'ई-चार्जिंग पॉईंट' विकसित करणार आहे
>
> – उदयसिंह पिसाळ, उपसरपंच

> “ लोकांना कायमस्वरूपी उपयुक्त ठरेल असे काहीतरी करण्याचा आमचा प्रयत्न होता. सहकारी सदस्यांच्या साथीने आम्ही हा प्रकल्प राबवू शकलो, याचा आम्हालाही अभिमान आहे.घरगुती सौर प्रकल्पासाठी अनुदान उपलब्ध असून ग्रामस्थांनी या योजनेचा लाभ घ्यावा.
>
> – सरपंच सौ. शुभांगी कांबळे

# पाटण तालुक्यातील गरजूंना कोयनामाई संस्थेचा आर्थिक हातभार

**राजदंड / पाटण**



पाटण तालुक्यातील कोयना विभागात कोयनामाई सामाजिक संस्था काम करत असताना कोयना भागातील गरजू लोकांना मदत करत असते, मग ती नैसर्गिक आपत्ती असो किंवा एखादा अपघात असो किंवा वैद्यकीय मदत असेल तेव्हा कोयनामाई सामाजिक संस्था '' एक हात मदतीचा'' म्हणून विभागातील लोकांच्या मदतीला उभे राहत असते.

वांझोळे गावच्या भगिनी सौ.माया सुतार यांच्या श्वास घेण्याच्या झडपा निकामी झाल्यामुळे त्यांना त्यांना श्वास घेण्यासाठी खूप त्रास होत होता, त्यांची शस्त्रक्रिया ताबडतोब होणे गरजेचे होते परिस्थिती बेताची असल्यामुळे एवढी मोठी शस्त्रक्रिया करण्यासाठी पैशाची गरज होती, यासाठी संस्थेकडे मदतीची विचारणा करण्यात आली यावर सर्व संचालक सदस्य यांनी मिळून विचार करून तातडीची आर्थिक मदत त्यांना देण्यात आली. तसेच कोयना विभागातील आजच्या तिथीला रानटी प्राण्यांनी धुमाकुळ घातल्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान खूप मोठ्या प्रमाणावर होत आहे,शेतकरी शेतात जाऊन काम करू शकत नाही, अशी हालत झालेली आहे. अशातच रानटी जनावरे शेतकऱ्यावर हल्ले करत आहे. यातच मणेरी गावातील दोन शेतकऱ्यांना गव्याने मारले असल्याची माहिती मिळाली या हल्ल्यामध्ये की. शुभम बाबर व श्री. सिताराम सावंत या दोघांवर शेतात काम करत असताना हल्ला केला प्रचंड मोठी दुखापत झाल्यामुळे त्यांना उपचारासाठी कराडला हलवण्यात आले.

या दोघांची प्रकृती खूप गंभीर असल्याची माहिती संस्थेला मिळाली परिस्थिती खूप बिकट आहे आर्थिक मातीची गरज आहे म्हणून संस्थेकडे विचारणा करण्यात आल्यावर आमच्या सर्व सदस्य व संचालक यांनी हा विषय मनावर घेऊन आर्थिक मदत गोळा करून ही तातडीची मदत घेऊन संस्थेचे अध्यक्ष श्री विजय बेबले सर व उपाध्यक्ष जयेश बाबर व संस्थेचे काही सदस्य यांनी त्यांच्या घरी जाऊन ती आर्थिक मदत देण्यात आली.

त्यावेळी या ठिकाणी सरपंच श्री राजेश पवार वांझोळे व धोंडीराम सावंत मणेरी तसेच गावातील ग्रामस्थ विलास काटे, शंकर काटे सर, सुरेश गुरव, सुरेश सावंत,संजय सावंत, संदेश साने उपस्थित होते या आर्थिक मदतीसाठी संस्थेचे संस्थापक-भरत मोहिते, अध्यक्ष-विजय बेबले (सर), उपाध्यक्ष-जयेश बाबर व अरविंद कदम, सचिव-शैलेश(भागवत) सावंत,उपसचिव- विजय शेलार, खजिनदार-अमर मोहिते,उपखजिनदार-अर्जुन सपकाळ,कार्याध्यक्ष- मंगेश गुरव, संचालक -अमर थोरवडे, विनोद इंगळे, शैलेश विचारे (सोशल मीडिया), मच्छिंद्रनाथ सुर्यवंशी, पांडुरंग यमकर, संजय मिटे, मनोज मोरे, विनायक ढमाल, जलाराम सपकाळ (सर) या सर्वांच्या सहकार्याने ही संस्था एक सेवाभावी संस्था म्हणून कोयना विभागात काम करत आहे.

# पाणी प्रश्नावर आता तालुका पाणी संघर्ष समिती आक्रमक!

- खटाव-माण तालुक्यात तारळी योजनेचं पाणी सोडा!;
- पाणी वाटपाचा दुजाभाव करणाऱ्या लोकप्रतिनिधी व प्रशासनाचा शिमगा ठोकून केला निषेध!

**राजदंड / वडूज**

मागील १ महिन्यापासून खटाव तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये भीषण पाणी व चारा टंचाई आहे. पाण्याचे टँकर कमी पडत आहेत.

खटाव तालुक्यातील १६ व माण तालुक्यातील २४ गावे अशी ४० गावे तारळी प्रकल्पावर अवलंबून आहेत.अनेक गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या येरळा तलावात पाणी नाही. पाणी टंचाई वर लोकप्रतिनिधी व प्रशासन गांभीर्याने विचार करत नाही.या पाणी प्रश्नावर संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता टोलवाटोलवी ची उत्तरे देत आहेत.

मंगळवारी जिल्हाधिकारी यांच्या सोबत याविषयी पाणी संघर्ष समितीची चर्चा होणार आहे. मात्र सद्यस्तिथीत खटाव आणि माण तालुक्यात पूर्ण दुष्काळी परिस्थिती आहे. शासनाने तारळीचं पाणी त्वरित देवून दुष्काळाची दाहकता कमी करावी अन्यथा पाणी प्रश्न पेटणार असून पुन्हा मोठी आंदोलने करावी लागतील असा इशारा तालुका पाणी संघर्ष समितीने वडूज ता खटाव येथील आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे.



यावेळी राष्ट्रीय काँग्रेसचे नेते रणजितसिंह देशमुख, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अनिल पवार, मार्केट कमिटी उपाध्यक्ष विजय शिंदे, राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा अध्यक्ष श्रीकांत देवकर,राष्ट्रीय काँग्रेसचे डॉ महेश गुरव,सरपंच योगेश जाधव,सामाजिक कार्यकर्तें ज्ञानेश्वर इंगवले आदींनी पाणी वाटपात जाणूनबुजून लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या कडून दुजा भाव होत असल्याच्या तीव्र भावना व्यक्त केल्या. लोकप्रतिनिधी व प्रशासन यांचा तालुका पाणी संघर्ष समितीच्या वतीने शिमगा करून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी संघर्ष समिती,कार्यकर्तें उपस्थित होते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत पिंपोडे खुर्द येथील दुचाकीस्वार युवक ठार

**राजदंड / कोरेगाव**



सातारा - लोणंद महामार्गावर पिंपोडे खुर्द येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार झाल्याची घटना काल सायंकाळी घडली. स्वप्निल रामचंद्र माने वय २२ रा. पिंपोडे खुर्द ता. कोरेगाव जि. सातारा असे मृत युवकाचे नाव आहे.

वाठार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शुक्रवार दि,२२ रोजी सायंकाळी आठच्या सुमारास घरातील लोकांना सांगून स्वप्निल हा मित्राची हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक एम एच ११ सी. बी ४७७२ वरून पद्मावती नावाच्या शिवारात जाण्यासाठी सातारा लोणंद राज्य महामार्गावरून वाठारच्या दिशेने जात असताना जगदाळे वस्ती समोर रोडच्या बाजूला एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्याच्या डोक्यास व हातापायास गंभीर मार लागल्याने तो बेशुद्ध अवस्थेत पडला दरम्यान ही घटना पोलीस पाटील अमोल कदम यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने घरी कळवले त्यानंतर गावकऱ्याच्या मदतीने त्यास सातारा येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले मात्र डॉक्टरांनी स्वप्निल यास मयत घोषित केले. सदर घटनेची फिर्याद आज शनिवार दि,२३ रोजी संजय ज्ञानदेव माने वय ५२ यांनी वाठार पोलिस ठाण्यात दिली असून वाठार पोलिसांनी अज्ञात वाहनाविरुद्ध गुन्हा नोंद केला असून तपास पोलीस हवालदार सहदेव तुपे करीत आहे.

# मावळ लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात

## २५५६ मतदान केंद्रांसाठी सुमारे १८ हजार कर्मचाऱ्यांची नेमणूक

**राजदंड / वडगाव मावळ**

मावळ लोकसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया १८ एप्रिलपासून सुरु होत असून मावळ लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. २५५६ मतदान केंद्रांसाठी सुमारे १८ हजार कर्मचारी नेमणूक करण्यात येणार असल्याची माहिती मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली.

> ''मावळ लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघातील प्रत्येकी एक आदर्श मतदान केंद्र जसे की त्या भागातील ऐतिहासिक, पर्यटन, भौगोलिक आदींची ओळख होईल असे करावे, अशा सूचना सहा सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना केल्या आहेत. त्यानुसार ते काम करत आहेत.
> – प्रवीण ठाकरे, समन्वयक, मावळ लोकसभा मतदारसंघ

**मतदार वाढविण्यासाठी उपाययोजना**

सरासरीपेक्षा कमी मतदान झालेले मतदान केंद्रे शोधले आहेत. अशा मतदान केंद्रांच्या परिसरात बैठका घेऊन मतदानात सहभाग वाढविण्यासाठी मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघात मिळून सुमारे ४५ मतदान केंद्र आहेत.

**मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जनजागृती**

नवीन मतदारांचा टक्का वाढविण्यासाठी महाविद्यालये व परिसरात शिबिरे घेऊन मतदानात सहभाग वाढविण्यासाठी मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

मतदान केंद्रांवर मंडप, पिण्याचे पाणी आदी सुविधा दिल्या जाणार आहेत.

**अपंग, ज्येष्ठांसाठी विशेष प्रयत्न**

अपंग, ज्येष्ठ व गर्भवती, लहान मुले असलेल्या महिला अशा मतदारांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. अशा मतदारांना आणण्यासाठी गाड्यांची सुविधा करण्यात आली आहे. अपंग व ज्येष्ठांसाठी मतदान केंद्रांवर रॅम्प व व्हीलचेअरची सोय करण्यात आली आहे. या मतदारांना त्रास होणार नाही, याची काळजी घेण्यात येणार आहे. त्यांच्यासाठी वेगळ्या रांगा करण्यात येणार आहेत.

विधानसभेच्या एका मतदारसंघातील एका मतदान केंद्रावर सर्व कर्मचारी, अधिकारी हे दिव्यांग असतील. त्याचप्रमाणे एका मतदान केंद्रावर सर्व कर्मचारी, अधिकारी महिला व एका मतदान केंद्रावर सर्व युवक कर्मचारी, अधिकारी असणार आहेत.

> **लोकसभा मतदारसंघात...**
> ''मावळ मतदारसंघात पिंपरी, चिंचवड, वडगाव मावळ, कर्जत, उरण व पनवेल या सहा विधानसभा मतदारसंघ येत आहे या मतदारसंघांची पाहणी झाली आहे. आता लवकरच कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.''
> – दीपक सिंगला, निवडणूक निर्णय अधिकारी, मावळ लोकसभा मतदारसंघ

**निवडणूक प्रक्रिया**

- अर्ज भरणे : १८ ते २५ एप्रिल
- अर्ज माघार : २९ एप्रिल
- मतदान : १३ मे
- निकाल : ४ जून

**विधानसभा मतदार संघ : ६**

- मतदान केंद्र : २५५६
- कर्मचारी : १८,०००

**लोकसभा मतदारसंघात मतदान..**

- पुरुष : १३ लाख १० हजार ४३४
- महिला : ११ लाख ९८ हजार ८६८
- इतर : १५९
- एकूण मतदार : २५ लाख ९ हजार ४६१

# शिरूर लोकसभा मतदारसंघातील आदिवासी बहुल भागात मतदार जागृती



**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

शिरूर लोकसभा मतदारसंघातील मंचर येथील अण्णासाहेब आवटे कॉलेजजवळील आदिवासी बहुल भागात स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

निवडणूक प्रक्रियेमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे यासाठी समाजातील विविध घटकांच्या सहभागाने प्रशासनातर्फे विविध जनजागृतीचे उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. मतदान प्रक्रियेत मतदानाचे प्रमाण व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग वाढावा यासाठी स्वीप अंतर्गत व्यापक जनजागृतीवर भर देण्यात आला असून मतदार जनजागृतीसाठी ग्रामीण भागामध्ये उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. याचाच एक भाग म्हणून शिरुर मतदारसंघात व्यापक प्रमाणात जनजागृतीवर भर देण्यात आला आहे.

'युवकांचे मतदान-राष्ट्र निर्माणातील योगदान' जागृत नागरिक होऊ या-अभिमानाने मत देवू या, या व अशाप्रकारच्या विविध घोषणा फलकांच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेविषयी आणि निवडणूक प्रक्रियेसंदर्भात आदिवासी भागात पथकाने मार्गदर्शन केले. मतदानाचा दिनांक, मतदानाचा कालावधी तसेच मतदान केंद्रावरील सुविधा याबाबत नव मतदार, तरुण, वयोवृद्ध नागरिकांना माहिती देण्यात आली. यावेळी अंबेगाव तहसील कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

आंबेगाव येथे मतदारांकडून मतदान करण्याबाबत संकल्पपत्र भरून घेण्यात आले. तसेच त्यांना मतदान केंद्राची माहिती कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शनही करण्यात आले. जुन्नर तालुक्यातील राजुरी येथील विद्या विकास मंदिर विद्यालयातर्फे मतदार जागृती फेरी आणि व्याख्यानाच्या माध्यमातून मतदार जागृती करण्यात आली.

# वडूजमध्ये पारधी समाजातील दोन गटांमध्ये तुफान हाणामारी!

### सार्वजनिक ठिकाणी मारामारी करून शांतता बिघडविली; सुमारे ११ जणांवर पोलिसांत गुन्हा दाखल

**राजदंड न्यूज नेटवर्क / वडूज**



वडूज, ता. खटाव गावच्या हद्दीतील शिवाजी चौकात वडूज ते दहिवडी जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर मतन लक्ष्मण शिंदे,वय ५५वर्षे राहणार गोपुज ता खटाव,किर्लोस्कर निरगेल शिंदे राहणार सिद्धेश्वर कुरोली ता. खटाव दिपाली किर्लोस्कर शिंदे राहणार सिद्धेश्वर कुरोली ता. खटाव,भजी मतन शिंदे राहणार गोपुज ता.खटाव,गिता रमेश शिंदे राहणार गोपुज ता. खटाव,वैशाली मतन शिंदे राहणार गोपुज ता. खटाव, नमशा देशमुक्या भोसले राहणार फलटण ता. फलटण,साहिल लहु शिंदे राहणार डिस्कळ ता.खटाव,मकरे अमित शिंदे राहणार डिस्कळ ता. खटाव लाहु-या लक्ष्मण शिंदे राहणार डिस्कळ ता. खटाव रमेश मतन शिंदे राहणार सिद्धेश्वर कुरोली ता. खटाव यांनी जमाव जमवुन आपआपसांत जोराचे भांडण करत सार्वजनिक ठिकाणी मारामारी करुन सार्वजनिक शांतता बिघडवुन गोंधळ घातल्या प्रकरणी अकरा जणांवर वडूज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे यांच्या सूचनेनुसार पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल माने व टीमने ही कारवाई केली.

## आंबेगाव येथे छ. शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

आंबेगाव तालुक्याच्या पुर्व भागात वळती येथे गुरुवारी (दि.२८ ) छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गावातील महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन नारळ वाढवून, ''जय भवानी, जय शिवाजी'' या जयघोषात शिवभक्तांनी महाराजांना त्रिवार अभिवादन करण्यात आले.

यावेळी गावातील शिवभक्त मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष धोंडीभाऊ भोर, सरपंच आनंद वाव्हळ, सोसायटीचे अध्यक्ष अशोक लोंढे, बाजीराव अजाब, शिवाजी लोखंडे , बन्सी अजाब, चंद्रकांत भोर, पोलीस पाटील प्रकाश लोंढे, हनुमंत बेनके, बाळु अजाब, बाळासाहेब शिंदे, आदी उपस्थित होते.

# मोहोळ यांच्या उमेदवारीवरून मी एकटाच नाही तर बरेचजण नाराज : संजयनाना काकडे

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

उमेदवार बदला असे म्हटलेले नाही. मात्र, उमेदीच्या काळात कोणी पक्षासाठी काय काय केले हे सांगितले. मी अजूनही १०० टक्के इच्छुक आहे आणि मोहोळांना उमेदवारी दिल्याने नाराज देखील १०० टक्के आहेच. मी एकटाच नाराज नाही तर बरेच जण नाराज आहेत. जोपर्यंत बी फॉर्म देण्यात येत नाही तोवर मी उमेदवारीसाठी प्रयत्न करत राहील, असे राज्यसभेचे माजी खासदार आणि भाजपचे नेते संजयनाना काकडे यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीसाठी कसब्याच्या पराभवाची मीमांसा करून उमेदवारी द्या, अशी मागणी पुणे भाजपच्या कार्यकर्त्यांकडून होत असताना वरिष्ठ नेत्यांनी माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी जाहीर केल्यापासून पक्षांतर्गत नाराजी आहे, पण पैलवानांची टीम माझ्याकडे आहे. घरोघरी प्रचार करेल असे सांगत विविध प्रिंट मीडियाच्या कार्यालयांना आणि जुन्या नव्या मान्यवर नेत्यांच्या भेटीगाठी घेत मोहोळ यांनी प्रचार सुरु केला आणि या नाराजीकडे सर्रास दुर्लक्ष करत वाटचाल सुरु ठेवली. नाराजी मोठ्या प्रमाणावर वाढतेय हे लक्षात आल्यावर मोहोळ यांनी परवा संध्याकाळी माजी खासदार आणि लोकसभा उमेदवारी स्पर्धेतील इच्छुक संजय काकडे यांची सर्वात शेवटी भेट घेतली. पण नाराजी मात्र येथे संपली नाही. या भेटीचे फोटो केवळ मोहोळ यांनीच आपल्या सोशल मिडियातुन प्रसारित केले. काकडे यांनी मात्र तसे काही केले नाही. या नाराजीच्या कायम राहण्याने सूत्रांच्या म्हणण्यानुसार काल संध्याकाळी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी काकडे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली तेव्हा काकडे यांनी आपल्या मनातील सारी व्यथा आणि ६ मतदार संघातील परिस्थिती चव्हाण यांच्यापुढे मांडली आणि हे सारे अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या पर्यंत पोहोचवा असेही ते म्हणाले.

# पाटण येथील महाविकास आघाडीचा संवाद मेळावा शनिवार ऐवजी रविवारी होणार

**राजदंड न्यूज नेटवर्क / पाटण**

सातारा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील मित्र पक्षांचा 'संवाद मेळावा' शनिवार होणार होता परंतु काही कारणास्तव हा मेळावा रविवारी दि.३१ मार्च २०२४ रोजी ऋचा हॉल, काळोली (कराड-चिपळूण रोड) येथे दुपारी १२:३० वा. होणार आहे. या संवाद मेळाव्यासाठी माजी मुख्यमंत्री व राष्ट्रीय काँग्रेसचे प्रमुख नेते पृथ्वीराज चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे चे माजी मंत्री आ.बाळासाहेब पाटील,माजी मंत्री आ.शशिकांत शिंदे, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर, शिवसेना उ.बा.ठाकरे पक्षाचे प्रवक्ते नितीन बानगुडे-पाटील, दिपक पवार, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव गोडसे , राष्ट्रीय काँग्रेसचे सरचिटणीस हिंदुराव पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, शिवसेना उ.बा.ठाकरे सातारा जिल्हा अध्यक्ष हर्षद कदम व राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाअध्यक्ष सुरेश जाधव या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते व सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर व पाटण तालुका अध्यक्ष राजाभाऊ शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

आगामी सातारा लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने हा संवाद मेळावा अत्यंत महत्त्वाचा आहे. पाटण विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या मेळाव्यातून उपस्थित मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. पाटण तालुका हा मतदानाच्या दृष्टीने फार मोठा मतदारसंघ असल्याने महाविकास आघाडीतील मित्र पक्षांमध्ये चांगला समन्वय साधून जास्तीत जास्त मतदान महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पारड्यात पाडण्यासाठी यावेळी रणनीती तयार करण्यात येणार असल्याचेही पत्रकात म्हटले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे प्रमुख नेते, सर्व पदाधिकारी, सर्व संस्थाचे चेअरमन, व्हॉ.चेअरमन, संचालक, आजी/माजी जि.प.सदस्य, आजी/माजी पं.स.सदस्य, आजी/माजी नगराध्यक्ष , उपनगराध्यक्ष, नगरसेवक/ नगरसेविका, आजी/माजी सरपंच, उपसरपंच , ग्रामपंचायत सदस्य व सर्व मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांनी या संवाद मेळाव्यासाठी उपस्थित रहावे अशी विनंती या पत्रकात शेवटी केली आहे.

# नागरिकांनी मताधिकाराचा वापर करावा : दादासाहेब गीते

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**



राज्यघटनेने १८ वर्षावरील भारतीय नागरिकाला लोकशाही प्रक्रियेमध्ये मतदानाचा अधिकार दिलेला आहे. या अधिकाराचा वापर करत अधिकाधिक नागरिकांनी लोकसभा निवडणुकीत मतदान करावे, असे आवाहन शिवाजीनगर मतदार संघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब गीते यांनी केले.

पंडित नेहरू सांस्कृतिक भवन येथे मतदार जनजागृतीकरिता शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व महिला बचत गटांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकारी रवी खंदारे, निवडणूक नायब तहसीलदार सायली धस, स्वीप समितीचे राजेंद्र मोरे, पांडुरंग महाडिक,दीपक कदम, सागर काशीद, डॉ. प्रभाकर वराडे, डॉ. नंदकुमार बोराडे,महेश मिस्त्री उपस्थित होते.

गीते यांनी भारत निवडणूक आयोगाच्या सीव्हीजील , मतदार नोंदणी करता व्होटर हेल्पलाइन, दिव्यांगांसाठी सक्षम, उमेदवारांच्या माहितीकरीत केवायसी अशा विविध मोबाईल ॲपबाबत माहिती दिली. स्वीपच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या मतदार जनजागृतीमुळे आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी योगा प्रात्यक्षिक, पथनाट्य सादरीकरणासह 'माझे मत माझा अधिकार' या विषयावर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी व महिला बचत गट सदस्य उपस्थित होते.

> **पालकसभेत मतदान जनजागृती**
> मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी शिवाजीनगर विधानसभा मतदार संघाअंतर्गत रामोशी वाडी येथील अंगणवाडी क्रमांक ६ येथे पालकसभेत मतदान प्रक्रियेची माहिती देण्यात आली.
> यावेळी पालकांना मतदान प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करुन मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. यावेळी सहायक निवडणूक अधिकारी दादासाहेब गीते, नायब तहसीलदार सायली धस आदी उपस्थित होते.

# ४० वर्षानंतर जुन्या मसूर - उंब्रज रस्त्याचे भाग्य उजळले

## जुन्या व्यापारपेठेला ऊर्जितवस्थेची आशा

**राजदंड / मसूर**

तब्बल ४० वर्षानंतर जुन्या मसूर - उंब्रज रस्त्याचे भाग्य उजळले आहे. गावाला लागून जाणाऱ्या या दुर्लक्षित रस्त्याचे काम झाल्याने मसूरकर नागरिकांसह उंब्रज, कोरेगावकडे जाणाऱ्यांना हा जवळचा मार्ग सोयीस्कर ठरणार आहे. जुन्या व्यापारपेठेला पुन्हा उर्जितवस्था येण्याची आशा बळावली जात आहे. दहा लाख रुपये मंजुरीतून काँक्रीट रस्त्याचे काम झाले.

मसूर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मंजूर झालेल्या आर.बी.लॉन पासून ते कोरेगावरोडकडे जाणारा रस्ता महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बऱ्याच वर्षापासूनची ग्रामस्थांची या रस्त्याबाबतची मागणी होती. परंतु हा रस्ता पूर्णतः दुर्लक्षित राहिला होता. रस्त्यासाठी १० लाख रुपये मंजूर झालेल्या काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन निवडणूक आचारसंहितेच्या अगोदर झाले होते. माजी सभापती मानसिंगराव जगदाळे यांच्या प्रयत्नातून रस्ता मार्गी लागला. मसूरचे सुपुत्र सांगली जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल ओसवाल यांच्या हस्ते रस्त्याचे भूमिपूजन झाले होते.



> गावालगतचा कोरेगाव रस्त्याला जोडणारा मसूर-उंब्रज जुना रस्ता म्हणून याची ओळख होती. पूर्वी उंब्रजला जाण्यासाठी गावातून जाणारा हा मार्ग होता. याच रस्त्याने मसूर रेल्वेस्टेशनला जाण्यासह बाजार समितीचा धान्य खरेदी-विक्रीचा व्यवहार मोठ्या प्रमाणात चालत होता. चाळीस वर्षांपूर्वी गावाबाहेरून बायपास रस्ता काढण्यात आला. त्यानंतर हा रस्ता दुर्लक्षित झाला.

> रस्ता दुर्लक्षित झाल्याने मोठे खड्डे व बाजूच्या झाडीने रस्त्यावर अतिक्रमण केले होते. त्यामुळे रस्त्याला अजिबात वर्दळ नसल्याने शुकशुकाट असायचा. जुन्या व्यापारपेठेला मोठा मार बसला. आता या रस्त्याचे भाग्य उजळले. आता या रस्त्यामुळे व्यापारपेठेला पुन्हा उर्जितावस्था येण्याची आशा बळावली जात आहे. जाण्या येण्यासाठी सुलभ व जवळचा मार्ग म्हणून सोयीस्कर ठरणार आहे.

# काँग्रेस सोशल मिडियाच्या प्रमुखपदी गुलामहुसेन हमीद खान यांची निवड

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**



शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पुणे लोकसभा निवडणुक २०२४ साठी सोशल मिडियाच्या प्रमुखपदी गुलामहुसेन हमीद खान आणि प्रेस मिडिया प्रमुखपदी राज अंबिके यांची नियुक्ती करण्यात आली. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या हस्ते काँग्रेस भवन येथे नियुक्ती पत्र देण्यात आले.

गुलामहुसेन खान (मो. ९६०४७७७७८६) हे पुणे शहर काँग्रेस कमिटीचे सोशल मिडिया अध्यक्ष असून सोशल मिडीयाच्या माध्यमातून त्यांचे पक्षकार्य अविरत सुरू आहे. त्याचबरोबर राज अंबिके (मो. ९८२२०८५४८५) हे काँग्रेस पक्षाचे गेली २० वर्षांपासून काम करीत आहेत. त्यांनी आत्तापर्यंत छडणख प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस प्रवक्ते पदी काम केले आहे त्यामुळे पक्ष संघटनेचा त्यांना दांडगा अनुभव आहे.

यावेळी शहर उपाध्यक्ष राजेंद्र भुतडा, हेमंत राजभोज, अजित जाधव, पप्पु सुर्यवंशी, रवि आरडे, मुन्ना खंडेलवाल आदी उपस्थित होते.

# अखेर अण्णा जागे झाले

**विरोधकांना इडीच्या माध्यमातून त्रस्त करून सोडणे ही भूमिका खुलेआम पध्दतीने भारतीय जनता पक्ष स्विकारत आहे. केजरीवाल यांना अटक करून भाजप सत्तेसाठी कोणतीही पातळी गाठू शकते हे स्पष्ठ झाले आहे. केजरीवालांना अटक केल्यानंतर त्यांना राजीनामा स्विकारून दूसरा कोणीतरी त्या गादीवर बसवायचा ही तर भाजपाची भूमिका स्पष्ट दिसते.**



केंद्रात व राज्यात भारतीय जनता पक्षाऐवजी अन्य पक्षांचे सरकार असताना त्यांना सळो की पळो करून सोडणारे 'अण्णा' गेल्या कित्येक वर्षांपासून शांत झोपले होते. अतिशय मोठ्या घटना घडूनही त्यांच्याकडून कुठलीही प्रतिक्रिया येत नसायची. पण दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक झाली आणि गाढ निद्रिस्त अवस्थेत असलेले अण्णा हजारे ताडकन जागे झाले आणि केजरीवालांना शाप देऊन मोकळेही झाले.

अनेकांना असे वाटले होते की, कदाचित केजरीवालांची बाजू घेऊन आता अण्णा मैदानात उतरतील. पण घडले मात्र भलतेच. अहमदनगरचे 'मिनी महात्मा' म्हणून ओळखले जाणारे अण्णा जनलोकपाल बिलासाठी थयथयाट करायचे. काँग्रेसने देश विकला असे जाहीर सभांमधून सांगायचे. त्यावेळी अण्णाच्या टीममध्ये अरविंद केजरीवाल हेदेखील एक म्होरके होते. केजरीवाल असो की, आजकाल 'निर्भय' बनवायला निघालेले विश्वंभर चौधरी असो, यांनी त्या काळात काँग्रेसला 'खलनायक' करण्याचा केलेला प्रयोग आज त्यांच्याच अंगलट आला. चौधरींवर तर पुणे, सिन्नरला हल्ला झाला. तर केजरीवालांना थेट तुरुंगवास. आज भारतात जी काही वाईट परिस्थिती सुरू आहे, त्या पापात केजरीवाल सारखे अनेक लोक सहभागी होते. काँग्रेस पक्षाने कधीही केजरीवालांना हात लावला नाही. दिल्लीच्या तत्कालिन मुख्यमंत्री स्व. शीला दीक्षित यांना धक्काबुक्की करण्याइतपत वातावरण या लोकांनी गढूळ केलं होतं. पण त्यांचे कर्म आज त्यांच्यावर उलटले आहे. आज जे 'बी' पेरले होते, अखेर 'अण्णा' जागे झाले! विरोधकांना ईडीच्या माध्यमातून त्रस्त करून सोडणे ही भूमिका खुलेआम पद्धतीने भारती जनता पक्ष स्वीकारत आहे. केजरीवाल यांना अटक करून भाजप सत्तेसाठी कोणतीही पातळी गाठू शकते, हे स्पष्ट झाले आहे. केजरीवालांना अटक केल्यानंतर त्यांचा राजीनामा स्वीकारून दुसरा कोणीतरी त्या गादीवर बसवायचा ही तर भाजपची भूमिका स्पष्ट दिसते. त्याची फळं ते चाखत आहेत. केजरीवालांना क्षणभर का होईना काँग्रेस सत्तेवर होती तेव्हा केलेला उतमात आठवला असेलच. असे असले तरी दिल्लीमध्ये अरविंद केजरीवाल यांची प्रतिमा 'मिस्टर क्लीन' अशीच आहे. देशाचा सच्चा, अत्यंत उच्चशिक्षित, अत्यंत अभ्यासू, जनतेचा कनवाळू, सत्यवादी माणुसकीचा महासागर, सर्वसामान्यांचा देव, इमानदारीचा गुरुवर्य अशा उपाध्या लोक केजरीवाल यांना देऊ लागले आहेत. लोकशाहीची देशात हत्या झाली असून लोकशाही राहिलीच नाही, अशी सार्वत्रिक प्रतिक्रिया आहे. केजरीवालांना देव संबोधून देवालाही परीक्षेला सामोरे जावे लागते आहे. संपूर्ण विश्व तुमच्या बरोबर आहे आणि राहणार, असे दिल्लीतील जनता बोलत आहे. त्यांची अटक म्हणजे विनाशकाले विपरित बुद्धी असून कदाचित जेलमध्ये राहून 'आप'च्या दिल्लीच्या सर्वच्या सर्व जागा निवडून आल्या तर ? हुकूमशाही लोकशाहीला कशी गळा धरून गप्प बसवते, ही दाखवण्याची संधी भाजपने साधली. पण हा डाव त्यांच्या अंगावर उलटू शकतो. सत्तर हजार कोटींचा घोटाळ्याचा आरोप लावलेल्या दादांना, जेलमध्ये टाकलेल्या भुजबळ, सरनाईक यांना भ्रष्टाचाऱ्यांसाठीचे आधारकेंद्र खोलणाऱ्यांनी अभयदान देऊन त्यांच्या गळ्यात सत्तेचा पट्टा अडकवून सत्तेच्या खुर्चीत बसवून तात्पुरती अभय योजना देऊ केली, हे सगळ्यांना स्पष्ट कळत आहे.

ईडी, सीबीआय कधीच पराधीन झाल्या असून मालकाच्या हुकुमाची इमानेइतबारे तालीम करीत आहे. केजरीवालांना तब्बल नऊवेळा समन्स बजावण्यात आले होते. परंतु, प्रत्येकवेळी त्यांनी ईडी कार्यालयात जाणं टाळलं. त्यांना अटक होणार याची त्यांनाच नव्हे तर दिल्लीतील जनतेलाही खात्री होती. सध्याच्या केंद्र सरकारचे विरोधकांच्या बाबतीतील धोरण पाहिल्यावर या प्रकरणात तथ्य असेलच याची खात्री कोणीच देऊ शकत नाही. विरोधकांना ईडीच्या माध्यमातून त्रस्त करून सोडणे ही भूमिका खुलेआम पद्धतीने भारतीय जनता पक्ष स्वीकारत आहे. केजरीवाल यांना अटक करून भाजप सत्तेसाठी कोणतीही पातळी गाठू शकते, हे स्पष्ट झाले आहे. केजरीवालांना अटक केल्यानंतर त्यांचा राजीनामा स्वीकारून दुसरा कोणीतरी त्या गादीवर बसवायचा ही तर भाजपची भूमिका स्पष्ट दिसते. पण आता असे म्हटले जाते की, मुख्यमंत्री पदाचा ते राजीनामा देणार नाही. भाजपला जे हवे ते होणार नाही असे दिसल्यास केजरीवालांना अधिक त्रास होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे ते तुरुंगातून सरकार चालवतील, अशी चर्चा होत आहे. अशाच एका प्रकरणात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक करण्यापूर्वीच त्यांनी राजीनामा दिला होता. मुख्यमंत्री पदावर असताना अटक झालेले देशाच्या इतिहासातील केजरीवाल हे पहिलेच मुख्यमंत्री ठरले. केजरीवालांना नेमकी कोणत्या कारणामुळे अटक झाली, याबाबत जनतेला सखोल माहीती नसतेच. पण अलीकडच्या काळात नेत्यांना अटक झाली तर जनतेला त्याचे काहीच वाटत नाही. कारण प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जनतेला काहीही फरक पडत नसतो. मात्र एक वेळ अशी येईल की, जनतादेखील अशा या धोरणात भरडली जाऊ शकते. पण या सगळ्यात एक प्रश्न असा उपस्थित होतो, की अरविंद केजरीवाल हे मुख्यमंत्री पदावर असताना त्यांना अटक कशी झाली? तसेच मुख्यमंत्री पदावरील व्यक्तींला अटक करण्याचे भारतातील नियम काय आहेत?

मुख्यमंत्र्यांना गुन्हेगारी प्रकरणात अटक करायची असेल, तर सर्वप्रथम विधानसभा अध्यक्षांची मंजुरी घ्यावी लागते. कलम १३५ अन्वये मुख्यमंत्र्यांच्या अटकेसाठी दिवसांचाही नियम आहे, जर विधानसभेचे अधिवेशन सुरू होणार असेल तर मुख्यमंत्र्यांना ४० दिवस आधी आणि ४० दिवस संपल्यानंतर अटक करता येणार नाही. सार्वत्रिक निवडणुका तोंडावर आल्यावर विरोधकांना लक्ष्य करण्यासाठी केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापर सुरू झाला असे दिसते. भाजपा सत्तेसाठी किती खोलवर झुकणार हे या अटकेवरून दिसून येते.

जयंत महाजन
९४२०६९१४२०

## शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला
# बाळंतविडा सोहळा उत्साहात साजरा
### राजमाता जिजाऊ माँ साहेबांना बाळंतिडा देण्याची अनोखी परंपरा



**नारायणगाव** : शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला म्हणजेच तिथीनुसार साजरी होणाऱ्या शिवजयंतीच्या आदल्या दिवशी गेली ४५ वर्षांपासून अविरतपणे बाळंतविडा उत्सव व छत्रपती शिवाजी महाराज पालखी सोहळा नारायणगाव व जुन्नर येथे उत्साहात साजरा करण्यात येतो.

स्वर्गीय बिंदू माधव जोशी यांनी १९७९ सालापासून नारायणगावात बाळंतिडा पालखी सोहळ्याला सुरुवात केली. याच अनुषंगाने नारायणगावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ तसेच विक्रांत क्रीडा मंडळ, ओमसाई सेवा मंडळ यांच्या माध्यमातून बाळंतविडा सोहळा बुधवार दि. २७ रोजी सायंकाळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अंबिका माता मंदिरातून जयघोषात जुन्नर कडे रवाना झाला.

जुन्नर येथील शिवभक्त व माजी नगरसेवक म.पा. काजळे यांच्या निवासस्थानासमोरून पालखीद्वारे बाळंतविड्याची मिरवणूक काढण्यात आली.

याप्रसंगी शिवभक्त अनिल दिवटे, माजी उपसरपंच संतोष वाजगे, शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, मधुकर काजळे व त्यांचे कुटुंबीय, नित्यानंद नेवकर, रविंद्र कोडीलकर, शरद कदम, निलेश गोरडे, भाऊ वारूळे, सुधिर ढवळे, पोपट कुरूंद, बाळासाहेब मुंढे, काका नेवकर, संजय फुलसुंदर, विजय आंबटकर,बाळासाहेब दळवी तसेच शिवछत्रपती शिवाजी महाराज चौक मित्रमंडळाचे युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

## सतीश गणपती देसाई यांची कार्याध्यक्षपदी निवड



**शिरोळ** : दानोळी ता शिरोळ येथील सामाजिक कार्यकर्ते सतीश गणपती देसाई यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) असंघटित कामगार विभाग, कोल्हापूर, जिल्हा, कार्याध्यक्ष,पदी, नुकतीच निवड करण्यात आली आहे यांच्या निवडीबाबतचे पत्र नितीन शहाजी मस्के जिल्हाध्यक्ष असंघटित कामगार संघटना (शरद पवार) यांनी सतीश देसाई यांना दिले आहे

सतीश देसाई हे सामान्य व समाजातील उपेक्षित वंचित लोकांच्या चळवळी करिता अग्रस्थानी असून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत असतात

## कळंबा तलावातील पाणीसाठ्याने तळ गाठला,
# ऐतिहासिक शाहूकालीन विहीर उघडी



**कळंबा** : यंदा प्रथमच मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अर्थात उन्हाळ्याच्या सुरुवातीला कळंबा तलावातीलपाणीसाठ्यानेतळ गाठला आहे. तलाव पात्रातील ऐतिहासिक शाहू कालीन विहीर उडली पडायला सुरुवात झाली आहे. या शाहू कालीन विहिरीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

कळंबा तलाव प्रदूषित होऊ नये म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी तलावानजीकची बालिंगा व कळंबा गावे तलाव पात्रापासून दूर वसवली. शिवाय संपूर्ण तलाव कोरडा पडला तरी ग्रामस्थांचे आणि मूक जनावरांचे पाण्याविना हाल होऊ नये म्हणून तलाव पात्रात भव्य विहीरीची उभारणी केली होती. आजमितीला कळंबा तलावात निव्वळ आठ फूटपाणीसाठाशिल्लक असून जलचरांच्या अस्तित्वासाठी हा पाणीसाठा पावसाळ्याच्या सुरवातीपर्यंत ठेवणे प्रशासनास क्रमप्राप्तच आहे.

पावसाळ्यास अद्यापही अडीच महिन्याचा कालावधी आहे. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगात होत असून डेड वॉटर शिल्लक राहिले तरी पाणीउपसा बंद करण्यात आला नसल्याने २०१६ नंतर पुन्हा यंदा तलाव कोरडा ठणठणीत पडणार हे निश्चित. त्यामुळे कळंबा ग्रामपंचायतीपुढे जैवविविधता कायम राखत पाणीप्रश्नाची भीषणता कमी करण्याचे मोठे आव्हान आहे.

**प्रशासनाने तलावाचा जीव घोटला**

गेल्या साठ वर्षात यशवंतग्राम निर्मलग्राम पुरस्कार विजेत्या कळंबा ग्रामपंचायतीला ग्रामस्थांसाठी स्वतःची पाणीपुरवठा योजना उभारता आली नाही. शिवाय पालिका मालिकीच्या तलावाचे पाणी ग्रामपंचायतिला हवे पण सत्तर लाखांची पाणीपट्टी भरण्याच्या प्रश्नी हात वर. तलावाच्या पाणलोट क्षेत्रात बिल्डर लॉबीने धुमाकूळ घातला असून त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणे सुरू झाले आहे. तर पालिका मालकीच्या तलावावर एकही कर्मचारी नियुक्त करण्यात आला नसल्याने तलावाची गटारगंगा होत आहे.

## पन्हाळ्यात तटबंदीला अचानक लागलेल्या आगीत
# झाडाझुडपांसह वन्यप्राणी भस्मसात



**राजदंड न्युज नेटवर्क**

पन्हाळा : पन्हाळगडावरील तटबंदी व त्यात असलेल्या जंगलाला अचानक तीन ठिकाणी लागलेल्या आगीत मोठया प्रमाणात झाडेझुडपे भस्मसात झाली तर अनेक पशुपक्षां बरोबरच वन्यप्राण्यांना जीव गमवावा लागला. तर बिबट्याचा अधिवास असलेले ठिकाण संपूर्ण जळुन गेले आहे.

पन्हाळगडाच्या पूर्वे कडील नायकीणीच्या सज्जा खालील ताटबंदिस अचानक आग लागली. या आगीने रौद्र रूप धारण केल्याने येथून जवळच असलेल्या पन्हाळा नगरपरिषदेचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासह परिसरात आग पसरली. दुपारच्या सुमारास अचानक लागलेल्या आगीमध्ये झाडाझुडपांन सह पाला- पाचोळा जळल्याने परिसरात धुराचे लोट पसरले होते. सायंकाळ पर्यंत पन्हाळा नगरपरिषदेचे अग्नीशमन दलाच्या वतीन आग आटोक्यात आणण्याचे काम सुरु होते.

याचवेळी पावनगडवरील महादेव मंदीर जवळील जंगलात दुपारच्या सुमारास आग लागली. या आगीत पावनगड व परिसरातील जंगल जळून खाक झाले. तसेच तबक उद्यान खाली असलेल्या लक्ष्मीचे कुरण येथेही दुपारच्या दरम्यान आग लागून मोठया प्रमाणात वन संपदा जळून खाक झाली. उन्हाचा कडाका अन् आगी मुळे उठणाऱ्या धुराच्या लोटाने आग आटोक्यात आणण्यात अडचणी निर्माण होत होत्या.अशा कठीण प्रसंगी न थाबता अथक परिश्रम घेत नगर परिषद व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणली. पण एकाचा वेळी तीन ठिकाणी आग कशी काय लागली याचे कारण मात्र समजले नाही. जाणीवपूर्वक वन्य प्राण्यांना येथून हटवण्यासाठी कोण तरी आग लावते आहे. अशी चर्चा परिसरातून रंगली आहे. आग लवणाऱ्यावर टेहळणी ठेवून वन विभगाने कडक कारवाई करावी आशी मागणी होत आहे.

# प्रणिती शिंदेंचा राम सातपुतेंना टोला





**सोलापूर** : घरातून चांगले संस्कार मिळावे लागतात, ते तुमच्याकडे नाहीत, ८३ वर्षांचे असूनही पवार साहेब व माझे वडील महाराष्ट्र पिंजून काढतात, तुम्हाला लढायचं असेल तर माझ्याशी लढा, मी उभी आहे, लाज वाटायला पाहिजे तुम्हाला, अशा शब्दांत महाविकास आघाडीच्या सोलापूरच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांनी नाव न घेता विरोधकांचा समाचार घेतला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वडाळा येथील संवाद बैठकीत त्या बोलत होत्या. मी १५ वर्षे उगीच निवडून आले का, असा प्रश्न विरोधकांना विचारत तुमची लेक लोकशाही, शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी लढतेय असे प्रणिती शिंदे म्हणाल्या.

माझे उत्तर तालुक्याशी १९७८ पासून संबंध आहेत, मला पाच वेळा तुम्ही निवडून दिले, नान्नजचे गंगाराम घोडके ताकदीने काम करायचे असे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यावेळी बोलताना म्हणाले. मोदी सरकारने लोकांचे प्रश्न बाजूला ठेवल्याचा आरोप करीत शरद पवार व मी वेगवेगळे झालो तरी आमचे नाते तुटले नाहीत, असे शिंदे म्हणाले.

यावेळी राष्ट्रवादीच्या महेश माने, प्रा. वैशाली साठे, प्रल्हाद काशिद, शरद माने, अभिजित पाटील यांनी आघाडीला का मतदान करायचे ? हे सांगितले. प्रास्ताविक जयदीप साठे यांनी, तर आभार नागेश पवार यांनी मानले. बैठकीला काँग्रेसचे सुरेश हसापुरे, चेतन नरोटे, शालिवाहन माने-देशमुख, राष्ट्रवादीचे अविनाश मार्तंडे, उपसरपंच अनिल माळी, रमेश सुतार, राजाराम गरड, बालाजी गरड, अमोल पाटील, जितेंद्र शिलवंत, दयानंद शिंदे, दीपक अंधारे, दिलीप माने, रतिकांत पाटील आदी उपस्थित होते.

# ठाकरे गटाचेनाराज विजय करंजकर यांची मराठा समाजाच्या मेळाव्यात हजेरी,चर्चांना उधान



**नाशिक** : शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या वतीने ज्याविजय करंजकरयांना लोकसभेच्या नाशिकच्या जागेची कबुली देण्यात आली होती. त्यांचा ऐनवेळी पत्ता कापल्याने नाराज झालेल्या करंजकर यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेत बंडखोरीचे संकेत दिले आहेत. त्यातच ते सकल मराठा समाजाच्या बैठकीस उपस्थित असल्याने चर्चेचा विषय ठरला. नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदार संघात उमेदवार उभे करण्यासाठी ही बैठक होती. मात्र आपण राजकीयदृष्टीने नव्हे तर समाजाची बैठक म्हणून उपस्थित राहिलो असे स्पष्टीकरण करंजकर यांनी दिले.-ऊाएठढखडएचएछढठाकरे गटाच्या वतीनेविजय करंजकरहेच उमेदवार असणार अशी चर्चा गेल्या वर्षभरापासून होती. कारण तसे संकेत पक्ष प्रमुख आणि उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुखांनी देखील दिले होते. मात्र, ऐनवेळच्या घडामोडीत राजकीय विजय करंजकर यांची उमेदवारी कापण्यात आली आणि सिन्नरचे माजी आमदार राजाभाऊ वाजे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे नाराज झालेल्या करंजकर यांनी बुधवारी (दि. २७) समर्थकांच्या बैठकीत नाराजी व्यक्त केली आणि ऐनवेळी उमेदवारी नाकारली असली तरी आपली सर्व तयारी झाली असल्याने निवडणूक लढविणारच असे सांगून बंडखोरीचे संकेत दिले.

# वाळवा तालुक्यातील धक्कादायक प्रकार मांत्रिकाच्या मदतीने आघोरी प्रकार

**इस्लामपूर** : मांत्रिकाच्या मदतीने वाळवा तालुक्यातील चिकुर्डे गावच्या स्मशानभूमीत काळ्या कापडात नारळ,लिंबू,काळ्या बाहुल्या त्यावर मुलींचे फोटो लावून धारधार दाभन खुपसण्याचा अघोरी प्रकार उघडकीस आला आहे. होळी पौर्णिमेपासून रस्त्याच्या लगत असणाऱ्या स्मशानभूमीत हा प्रकार सुरू होता. आज बुधवारी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी स्मशानभूमीत धाव घेत हा प्रकार उघडकीस आणला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रधान सचिव संजय बनसोडे, कार्यकर्ते निवृत्त उपप्राचार्य बी. आर. जाधव, निवृत्त प्राचार्य सुदाम माने,विनोद मोहिते यांनी हा नेमका काय प्रकार आहे हे उघडकीस आणल्यावर उपस्थित नागरिकांचे प्रबोधन करून स्मशानभूमीची स्वच्छता केली.

कुरळप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज सरनोबत म्हणाले, या प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेऊन मुळापर्यंत तपास करू. कोणत्याही मुलींची ओळख जाहीर न करता गोपनीय तपास करून दोषींवर गुन्हे दाखल करू.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी पोलीस पाटलांच्या समक्ष काळ्या कापडातील लटकत्या बाहुल्या व इतर साहित्य काढले.आत पाहिल्यावर धक्कादायक प्रकार उघडकीस आला. कापड सोडल्यावर त्यातून नारळ, त्यावर काळी बाहुली,लिंबु व मुलींचे रंगीत फोटोला टोकदार दाभनातून नारळात खुपसले होते. तर नारळाला लाल रंगाचा दोरा गुंडाळून त्यात कागदी चिठ्या खुपसल्या होत्या. त्या उघडून पाहिल्यावर कागदावर मुलीचे नाव लिहले आहे. अशी पाच गाठोडी आहेत. यात पाच वेगवेगळ्या मुलींचे फोटो व नावे आहेत. एका कागदावर एका मुलाचे नाव आहे. हे सर्व साहित्य पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

त्यानंतर अंनिसच्या कार्यकर्त्यांनी स्मशानभूमीची स्वच्छता केली. वाळवा तालुक्यातील चिकूर्डे सारख्या सदन गावात हा रस्त्यालगत असणाऱ्या स्मशानभूमीत प्रकार घडल्याने गावात दहशत निर्माण झाली होती.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते विनोद मोहिते म्हणाले, या प्रकारातील फोटो पाहता सोशल मीडियावर असणारे फोटो घेऊन रंगीत झेरॉक्स काढण्यात आल्या आहेत असे वाटते. आपल्या मुली सोशल मीडियावर फोटो टाकतात त्याचा दुरूपयोग होतो याबाबतीत

होळी पोर्णिमे नंतर स्मशानभूमीत पहिल्यांदा तीन नारळ काळ्या कापडात बांधून मृतदेह दहन करणाऱ्या रॅकला लटकावले होते. ते आमच्या निदर्शनास आले. पुन्हा दुसऱ्या दिवशी दोन नारळ काळ्या कापडात लटकावले गेले. पुन्हा कोण असे करतंय का ? हे पाहण्यासाठी आम्ही गावकऱ्यांनी पाळत ठेवली.पण पुन्हा कोणी आढळले नाही. म्हणून आम्ही महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला संपर्क साधला. तत्पूर्वी आम्ही सरपंच रणजीत पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना याची माहिती दिली होती.

आज अंनिसच्या कार्यकर्त्यांनी पोलीस व नागरिकांच्या समोर बांधलेल्या काळ्या कापडात नेमके काय ते पाहिले असता धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादू टोणा प्रतिबंध व उच्चाटन कायदा २०१३ नुसार गुन्हा दाखल करावा. यासाठी संबंधित फोटोतील युवती , नाव असणारा मुलगा कोण ? यांच्या मुळापर्यंत पोलिसांनी जावे. या मुलांना हा प्रकार कोणी करायला भाग पाडले आहे का ? हे तपासावे व दोषींवर जादू टोणा विरोधी कायद्याने कारवाई करावी अशी मागणी अर्जाद्वारे केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# कर्णधाराच्या एका चुकीमुळे मुंबईची धुलाई



आयपीएलच्या सतराव्या हंगामासाठी दोन नवीन खेळाडूंची या स्पर्धेत एन्ट्री झाली आहे. कोलकाता नाईट रायडर्सने जखमी मुजीब उर रहमानच्या जागी अल्लाह गझनफरची निवड केली तरराजस्थान रॉयल्सने इंडियन प्रीमिअर लीग २०२४ साठी प्रसिध्द कृष्णाच्या जागी केशव महाराजला संघात समाविष्ट केले आहे.

गझनफरने २ वन डे सामन्यांमध्ये अफगाणिस्तानचे प्रतिनिधित्व केले आहे. या युवा खेळाडूने ३ ट्वेंटी-२० आणि ६ प्रथम श्रेणी सामने खेळले असून, त्याच्या नावावर अनुक्रमे ५ आणि ४ बळींची नोंद आहे. त्याला केकेआरने २० लाख रूपयांच्या मूळ किंमतीत खरेदी केले.भारताचा वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णा दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर आहे. अलीकडेच त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली आणि तो सध्या विश्रांती घेत आहे. त्याच्या जागी राजस्थान रॉयल्सने दक्षिण आफ्रिकेच्या केशव महाराजला आपल्या संघात घेतले. महाराजने २७ ट्वेंटी-२०, ४४ वन डे आणि ५० कसोटी सामने खेळले आहेत. त्याच्या नावावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २३७ बळींची नोंद आहे. त्याने १५९ ट्वेंटी-२० सामन्यांमध्ये १३० बळी घेतले आहेत. राजस्थानने त्याला ५० लाख रूपयांच्या मूळ किंमतीसह आपल्या संघाचा भाग बनवले.

# तिलक वर्मानं सांगितलं त्याच्या सेलिब्रेशनचं कारण



(SRH vs MI) यांच्यात बुधवारी सामना झाला. हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ३ बाद २७७ धावा केल्या. आयपीएलच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या म्हणून हैदराबादच्या डावाची नोंद झाली. जसप्रीत बुमराह वगळता मुंबईच्या सर्वच गोलंदाजांची बेक्कार धुलाई झाली. ट्रॅव्हिस हेड, अभिषेक शर्मा, हेनरिक क्लासेन आणि एडन मार्करम यांनी चांगलेच हात साफ केले.

हैदराबादने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईने देखील स्फोटक सुरुवात केली. सुरुवातीला इशान किशनने छोटा पॅकेट बडा धमाका दाखवला. तर त्यानंतरतिलक वर्मानेशानदार अर्धशतकी खेळी केली. अर्धशतक झळकावल्यानंतर तिलकने जे सेलिब्रेशन केले त्याची चांगलीच चर्चा रंगली.

सामन्यानंतर तिलकने याबाबत स्पष्टीकरण दिले असून सूर्यकुमार यादवसाठी हे सेलिब्रेशन असल्याचे त्याने स्पष्ट केले. तो म्हणाला की, हे सेलिब्रेशन 'सूर्या'साठी होते, त्याला आम्ही खूप मिस करत आहोत. लवकरत तो आमच्यासोबत जोडला जाईल. सूर्यकुमार यादव दुखापतीमुळे सध्या क्रिकेटपासून दूर आहे. 'सूर्या' शेवटच्या वेळी डिसेंबर २०२३ मध्ये मैदानात दिसला होता. दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या मालिकेपासून तो क्रिकेटपासून दूर आहे. त्याच्या पायाला दुखापत झाली असून त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मुंबई इंडियन्सला गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. दोन्हीही सामन्यांमध्ये मुंबईचा संघ धावांचा पाठलाग करत होता. दरम्यान,सनरायझर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामन्यात यजमान हैदराबादच्या फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडत विक्रमी २७७ धावसंख्या उभारली. धावांचा यशस्वीरित्या बचाव करूनहैदराबादने मुंबईला नमवून विजयाचे खाते उघडले. तगड्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सने खूप संघर्ष केला. सलामीवीर इशान किशन आणि त्यानंतरतिलक वर्मायांनी अप्रतिम खेळी करून सामन्यात रंगत आणली. पण विशाल आव्हानापर्यंत पोहोचताना मुंबईच्या शिलेदारांना घाम फुटला.२७८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईला घाम फुटला. मुंबईचा संघ निर्धारित २० षटकांत ५ बाद २४६ धावा करू शकला आणि सामना ३१ धावांनी गमावला.

# १६ चेंडूत ५० धावा! अभिषेक शर्मा सुस्साट



या सामन्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. हैदराबादच्या फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडत विक्रमी २७७ धावसंख्या उभारली. अखेर हैदराबादने मुंबईला नमवून विजयाचे खाते उघडले.

सनरायझर्स हैदराबादने धावांचा डोंगर उभारल्यानंतर मुंबई इंडियन्सने खूप संघर्ष केला. सलामीवीर इशान किशन आणि त्यानंतर तिलक वर्मा यांनी अप्रतिम खेळी करून सामन्यात रंगत आणली.

पण तगड्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईला अपयश आले. हैदराबादने दिलेल्या २७८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईला घाम फुटला. मुंबईचा संघ निर्धारित २० षटकांत ५ बाद २४६ धावा करू शकला आणि सामना ३१ धावांनी गमावला. २७८ धावांच्या तगड्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईच्या फलंदाजांनी चांगला संघर्ष केला. १०हैदराबाद आणि मुंबई या सामन्यात एकूण ५२३ धावा झाल्या. मुंबईच्या संघाने २४६ तर हैदराबादने २७७ धावा कुटल्या. सनरायझर्स हैदराबादच्या तीन फलंदाजांनी जलद अर्धशतक झळकावण्याची किमया साधली. ट्रॅव्हिस हेड (१८ चेंडू) अभिषेक शर्मा (१६ चेंडू) आणि हेनरिक क्लासेनने (२४) चेंडूत अर्धशतक झळकावले. हैदराबादने उभारलेली २७७ ही धावसंख्या आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक धावसंख्या ठरली आहे.

तर, आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईने २४६ धावा करून लक्ष्याचा पाठलाग करताना सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला.

खरं तर आयपीएलच्या एकाच सामन्यात सर्वाधिक षटकार या सामन्यात पाहायला मिळाले. या सामन्यात दोन्ही संघांनी मिळून ३८ षटकार ठोकले. एका ट्वेंटी-२० सामन्यात सर्वाधिक षटकार आणि सर्वाधिक धावा सनरायझर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामन्यात पाहायला मिळाल्या. यजमान संघाकडून हेडने ३ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने २४ चेंडूत ६२ धावा केल्या.

तर अभिषेक शर्माने ७ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने २३ चेंडूत ६३ धावा कुटल्या. एडन मार्करम आणि हेनरिक क्लासेन यांनी देखील हात साफ केले. एडन मार्करमने १ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने २८ चेंडूत नाबाद ४२ धावा केल्या, तर हेनरिक क्लासेनने ७ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने ३४ चेंडूत ८० धावा कुटल्या आणि ऐतिहासिक धावसंख्या उभारली. यजमान हैदराबादने निर्धारित २० षटकांत ३ बाद २७७ धावा केल्या होत्या.

## आपलं मनोरंजन

# 'बंदिश बैंडिट्स'नंतर श्रेया चौधरी झळकणार या प्रोजेक्ट्समध्ये



श्रेया चौधरीने मेझॉन प्राइमवरील लोकप्रिय सीरीज 'बंदिश बैंडिट्स'मधून सिनेइंडस्ट्रीत पदार्पण केले. या सीरिजमधून तिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तेव्हापासून, श्रेया चित्रपट निर्मात्यांच्या यादीत अग्रस्थानी आहे. तिने शोमध्ये तिच्या अविश्वसनीय अभिनयाने सर्वांना प्रभावित केले आहे. श्रेयाने एक अभिनेत्री म्हणून स्वत:ला अधिक उत्तम होण्यासाठी वेळ दिला आहे आणि त्यानंतर आता ती मेझॉन प्राइमवरील दोन टेंटपोल प्रोजेक्ट्स घेऊन परतली आहे.

यावर्षी, श्रेया चौधरी 'द मेहता बॉईज' या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटातून अभिनेता बोमन इराणी दिग्दर्शनात पदार्पण करत आहे. श्रेया बहुप्रतिक्षित सीरीज बंदिश बैंडिट्स दुसऱ्या सीझनमध्येही तिची भूमिका पुन्हा साकारणार आहे. श्रेया म्हणते, एक अभिनेत्री म्हणून, मी करत असलेल्या कामाच्या दृष्टीने आणि लोक मला कोण म्हणून पाहतील या दृष्टीने हे निश्चितच माझे सर्वोत्तम वर्ष आहे. ॲमेझॉन प्राइम वीडियो सारख्या जागतिक स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर दोन टेंटपोल प्रोजेक्ट्स असणे आश्चर्यकारक वाटते! एक कलाकार म्हणून माझ्याकडे असलेल्या विविध गुण ते दाखवतील.

बोमन इराणीसोबतच्या तिच्या चित्रपटाबद्दल बोलताना श्रेया म्हणाली, बोमन इराणी सरांसारख्या क्रिएटिव्ह मास्टरमाईंडकडून दिग्दर्शन करण्याची संधी दररोज मिळतेच असे नाही! द मेहता बॉईजमध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली मला खूप काही शिकायला मिळाले आणि मला अभिमान वाटतो की मी त्यांच्या व्हिजनचा भाग होण्यासाठी मी पुरेशी चांगली आहे असे त्यांना वाटले!

बंदिश बँडिट्स सीझन २

बंदिश बँडिट्स सीझन २ च्या घोषणेवर तिचा उत्साह व्यक्त करताना, श्रेया पुढे म्हणाली, माझी मालिका बंदिश बँडिट्स २ या वर्षी देखील प्रदर्शित होईल. त्यामुळे मी खूप आनंदी आहे! बंदिश बँडिट्स सीझन १ ने मला एक अभिनेत्री म्हणून खूप प्रशंसा दिली, खूप प्रेम दिले.



मुलांनी लहानपणापासूनच चांगला आहार घेतला तर त्याचे आरोग्य चांगले राहते आणि कोणत्याही आरोग्याच्या समस्याही उद्भवत नाही. लहानपणी मुलांची ग्रास्पींग पॉवर खूप चांगली असते. लहानपणी मुलं ज्या काही गोष्टी करतात, ज्या वातावरणात वाढतात ते नेहमीच लक्षात ठेवतात. रोजच्या आहारात काही पदार्थांचा समावेश केल्यास मुलांची स्मरणशक्ती चांगली राहण्यास मदत होईल.

**दही**

दही मेंदूच्या वाढीसाठी मदत करते. यात प्रथिने, कोलिन आणि आयोडीन यांसारखी पोषक तत्व असतात. त्यामुळे तब्येतीच्या समस्या उद्भवत नाहीत.

# तल्लख बुद्धीसाठी मुलांना खायला द्या ५ पदार्थ खा; स्मार्ट होतील मुलं- स्मरणशक्तीही वाढेल

**ताज्या भाज्या**

ताज्या भाज्या व्हिटामीन आणि प्रोटीनचा चांगला स्त्रोत आहे. मुलांच्या मेंदूच्या विकासासाठी हिरव्या भाज्यांचे सेवन करायलाच हवे. पालक, फ्लॉवर, ब्रोकोली, पनीर, शिमला मिरची, गारज, बीट अशा पदार्थांच्या मुलांच्या आहारात समावेश असावा.

**दूध**

दूध हे मुख्य अन्न आहे. जर तुम्हाला तुमच्या मुलाचे डोकं तीक्ष्ण बनवायचे असेल तर त्याला नक्कीच दूध द्या. दुधात कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे आढळतात ज्यामुळे वाढ होण्यास मदत होते. फॉस्फरस आणि व्हिटॅमिन डी दुधामध्ये आढळतात, ज्यामुळे हाडे, नखे आणि दात निरोगी राहतात.

**केळी**

केळी खाल्ल्याने त्वरित ऊर्जा मिळते आणि हे लहान मुलांचे आवडते फळ आहे. केळी खाल्ल्याने व्हिटॅमिन बी६, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि फायबर मिळतात, जे मुलाच्या विकासात मदत करतात.

**ड्रायफ्रुट्स**

सुरुवातीपासूनच मुलांना सुका मेवा खाण्याची सवय लावा. विशेषतः भिजवलेले बदाम, अक्रोड आणि मनुका मुलांना रोज खायला द्या. यामुळे मुलाचे मन शांत होईल आणि शारीरिक विकासासही मदत होईल.

ओट्स, गाजर, नट्स बटर, फळं, बिया, चपाती, डाळींचे पदार्थ, भाज्यांचे सॅण्डविच हे पदार्थ मुलांना खायला देऊ शकता.

# 'ही' महिला नसती तर कदाचित 'Mercedes Benz' वाहन निर्माता कंपनीच अस्तित्वात नसती



प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका महिलेचा हात असतो असं म्हटलं जातं. जगातील सर्वात लग्झरी वाहन निर्माता कंपनी मर्सिडिज बेंझच्या यशामागे एका महिलेची भूमिका महत्त्वाची आहे. या महिलेमुळेच मर्सिडिज नावारुपाला आली. ती नसती तर कदाचित ही कंपनी अस्तित्वातही आली नसती. बर्था बेंझ या महिलेने पहिल्यांदा जगाला कारची ओळख करून दिली. कार्ल फ्रेडरिक बेंझ ऑटोमोबाईल इंडस्ट्री त्यांच्या विशेष योगदानासाठी प्रसिद्ध आहे. जर्मनीतील कार्ल बेंझ हे व्यवसायाने एक ऑटोमोटिव्ह इंजिनिअर आणि इंजिन डिझाईनर होते. १९८८ मध्ये त्यांनी पहिली कार बेंझ पेटेंट मोटर वॅगर तयार केली होती. पण ही कार कधी रोडवर धावेल वाटलं नव्हते. या कारला जगातील पहिली मॉर्डन प्रॅक्टिकल कार म्हणून ओळखले जाते. बेंझ भलेही त्यांच्या कारबद्दल साशंक होते. परंतु एक महिला होती जी पूर्ण विश्वासाने ही कार रस्त्यावर धावू शकते असं सांगत होती. ही महिला दुसरी कुणी नसून त्यांची पत्नी बर्था बेंझ होती. कार्ल यांच्या यशामागे पत्नी बर्था बेंझ यांचे मोठे योगदान आहे. जर बर्था बेंझ नसत्या तर त्यांच्या पतीने इतका मोठा निर्णय कधी घेतला नसता. कार्ल बेंझ यांनी पहिली कार बनवली परंतु ती विकण्यात यश आले नाही. कार्ल बेंझ आणि पत्नी बर्था बेंझ हे निराशेत होते. जवळपास ३ वर्ष बाजारात असलेली ही कार विक्री झाली नव्हती. कदाचित ही कार कुणी वापरली नसावी त्यामुळे ती खरेदी केली जात नसेल असं बर्था बेंझ यांना वाटले. त्यामुळे त्यांनी स्वत: ही कार चालवण्याचा निर्णय घेतला. एकदा सकाळी बर्था बेंझ उठल्या आणि कार्ल यांना कुठलीही माहिती न देता त्यांनी कार गॅरेजमधून बाहेर काढली. बर्था बेंझ त्यांच्या २ मुलांना घेऊन ऐतिहासिक प्रवासावर निघाल्या. रस्त्यावर ३ चाकांचे वाहन पाहून अनेकांना विश्वास बसत नव्हता. रस्त्यावर धावणाऱ्या या कारचं स्टेअरिंग एका महिलेच्या हातात होते हे बघून अनेकजण आश्चर्यचकीत झाले. बर्था बेंझ ज्या रस्त्याने जात होती प्रत्येक जण त्यांच्या कारकडे बघत होता. परंतु अचानक जगातील पहिली कार अचानक बंद पडली. बर्था बेंझ यांनी खाली उतरून कारचं निरिक्षण केले तेव्हा एका जागेवरून काही लिकेज होत असल्याचे दिसले. भलेही कार बंद पडली परंतु बर्था बेंझ निराश न होता. ड्रेसच्या कापडाचा एक तुकडा कापून त्यांनी लिकेज पाईप बंद केली. त्यानंतर कार पुन्हा सुरू झाली. बर्था यांनी १०६ किमी अंतर कापले. याच प्रवासामुळे ऑटो इंडस्ट्रीचा प्रवास कधीही न संपणाऱ्या दिशेने सुरू झाला. बर्था बेंझ ही कार घेऊन त्यांच्या आईला भेटण्यासाठी गेल्या होत्या असा दावा करण्यात येतो. परंतु जनतेला दाखवण्यासाठी हा प्रवास केला. त्यांच्या पतीने बनवलेल्या कारचा अविष्कार सिद्ध करण्यासाठी त्यांनी प्रत्यक्षात काम केले.

# वयाच्या चाळीशीत लोकसभेत अन् आता पुन्हा राजकारणात; असा राहिला गोविंदाचा राजकीय प्रवास

बॉलिवूडवर कधीकाळी अधिराज्य गाजवणारा 'हिरो नंबर १' असलेला अभिनेता गोविंदा याने पुन्हा एकदा राजकारणातील नव्या प्रवासाला सुरुवात केली आहे. जवळपास १४ वर्षानंतर गोविंदाने राजकारणात पुनरामगन केले आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत गोविंदाने प्रवेश केला आहे. गोविंदाच्या राजकीय प्रवासाची सुरुवात ही एखाद्या चित्रपटाला साजेशी ठरली. मात्र, त्याच्या खासदारकीचा टर्मचा क्लायमॅक्स हा 'खलनायकी' ठरला. लोकांना उपलब्ध न होणारा, मतदारसंघाकडे दुर्लक्ष केलेला खासदार अशी गोविंदाची चर्चा होऊ लागली.

**मतदारसंघावर भाजपची पकड**

गोविंदाने काँग्रेसकडून २००४ ची लोकसभा निवडणूक लढवली. मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातून गोविंदाला उमेदवारी देण्यात आली होती. या मतदारसंघात भाजपचे वर्चस्व होते. भाजपचे ज्येष्ठ नेते राम नाईक यांनी मुंबई उत्तर या लोकसभा मतदारसंघावर पकड होती. त्यांनी १९८९, १९९१, १९९६,१९९८ आणि १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत विजय मिळवला.

मुंबई उत्तर हा लोकसभा मतदारसंघ हा पूर्वी विरारपर्यंत होता. मुंबई आणि त्यावेळच्या ठाणे जिल्ह्यातील काही भागाचा समावेश होता. २००९ मध्ये मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यानंतर हा नालासोपारा, वसई-विरार हा भाग पालघर मतदारसंघाला जोडला गेला.

**गोविंदा ठरला जाएंट किलर**

मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघ जिंकण्यासाठी काँग्रेसने कंबर कसली होती. सलग पाच लोकसभा निवडणूक जिंकणारे आणि तत्कालीन केंद्रीय मंत्री राम नाईक यांच्यासाठी ही निवडणूक सोप्पी असल्याचे म्हटले होते. त्यावेळी काँग्रेसने गोविंदाला थेट निवडणुकीत उतरवले. त्यावेळी गोविंदाचा सुपरस्टार होता. त्याशिवाय गोविंदाचे बालपण हे विरारमध्ये गेले होते. त्यामुळे विरार का छोरा असलेल्या गोविंदाला उमेदवारी देण्याचा डाव काँग्रेसने खेळत या भागातील मते वळवण्यासाठी प्रयत्न केले.

२००४ चा लोकसभा निवडणूक निकाल अतिशय धक्कादायक होता. गोविंदाला ५ लाख ५९ हजार ७६३ मते मिळाली. तर, राम नाईक यांना ५ लाख ११ हजार ४९२ मते मिळाली. गोविंदाला मतदानाच्या एकूण ५० टक्के मते मिळाली. गोविंदाला वसई-विरार पट्ट्यातील नेते हितेंद्र ठाकूर यांच्यासोबतची असलेल्या मैत्रीची देखील मदत झाली. वसई-विरार भागात गोविंदाला चांगली मते मिळाली.



**कसा होता खासदारकीचा काळ?**

गोविंदाने आपल्या निवडणूक प्रचारात आपल्या अजेंड्यावर प्रवास (वाहतूक), स्वास्थ्य (आरोग्य) आणि ज्ञान (शिक्षण) असणार असल्याचे म्हटले. पश्चिम रेल्वे क्षेत्राच्या बोरिवली-विरार विभागात रेल्वेची चार मार्गिका करण्याचे श्रेय आपले असल्याचे गोविंदाने म्हटले. गोविंदा खासदार असताना रेल्वेच्या मुद्यावर स्थानिक पातळीवर डीवायएफआय या डाव्या युवक संघटनेच्या नेतृत्वात मोठे सातत्याने आंदोलन झाले होते. त्याच्या परिणामी बोरिवली-विरार मार्गातील रेल्वे मार्गिकेच्या कामाला वेग आला होता.

गोविंदाने आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात काही प्रयत्न केले. वसई आणि विरारमधील अंगणवाड्या बांधण्यासाठी आणि पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी गोविंदाने त्याच्या खासदार निधीतून पैसे दिले होते. परंतु प्रशासकीय मंजुरीला उशीर झाला.

संसद सदस्य म्हणून त्यांच्या कार्यकाळात, लोकसभेचे अधिवेशन चालू असताना गोविंदा सहसा अनुपस्थित असायचे आणि निष्क्रियतेबद्दल त्यांच्यावर कठोर टीका केली गेली. खासदार असताना गोविंदाने चित्रपटात काम करणे सुरू ठेवले होते. २००७ मध्ये पार्टनर या चित्रपटात त्याने काम केले होते.

राजकारण आणि फिल्मी करिअरमध्ये गोविंदाला सुवर्णमध्य साधता आला नाही. अखेर २००८ मध्ये त्याने राजकारणातून या पुढे माघार घेणार असल्याचे म्हटले. राजकारणात आल्याने आपले सिने कारकिर्दीचे नुकसान झाले असल्याचे गोविंदाने एका मुलाखतीत म्हटले होते.

# ओवेसींचा हैदराबादी किल्ला भेदणार सानिया?



## बडा पक्ष निवडणूक मैदानात उतरवण्याच्या तयारीत!

भारताची दिग्गज टेनिस स्टार सानिया मिर्झालोकसभा निवडणूक २०२४ च्या माध्यमाने राजकारणात एन्ट्री करू शकते. या लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्ष ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुसलमीन (एआयएमआयएम) प्रमुखअसदुद्दीन ओवेसीयांच्या विरोधात हैदराबादमधून सानियाला उमेदवारी देण्याच्या विचार असल्याचे समजते.- ऊतएठढखडएचएछ्ढमनीकंट्रोलने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या (सीईसी) बुधवारी झालेल्या बैठकीतसानिया मिर्झाच्यानावावरही चर्चा झाली. या बैठकीत काँग्रेसने गोवा, दमण, दीव, तेलंगणा, यूपी आणि झारखंडसाठी १८ उमेदवारांच्या नावांना मंजुरी दिली होती. यावेळी सानिया मिर्झालाही निवडणुकीच्या रणांगणात उतरवण्यावर चर्चा झाली.हैदराबाद शहरातील आपली सैल झालेली पकड सानिया मिर्झाच्या लोकप्रियतेचा फायदा घेत पुन्हा एकदा मजबूत करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे, असे संबंधित वत्तात म्हणण्यात आले आहे.

खरे तर, काँग्रेसने हैदराबादमध्ये १९८० मध्ये शेवटची निवडणूक जिंकली होती. तेव्हा एस नारायण हे काँग्रेसच्या तिकिटावर खासदार म्हणून निवडून आले होते.

आता उमेदवारीसाठी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि आताचे काँग्रेस नेते मोहम्मद अझहरुद्दीन यांनी सानिया मिर्झाचे नाव सुचवले होते. या दोन्ही खेळाडूंमध्ये कौटुंबिक संबंध आहेत. २०१९ मध्ये अझहरुद्दीन यांचा मुलगा मोहम्मद असदुद्दीन याचे लग्न सानिया मिर्झाची बहीण अनम मिर्जा सोबत झाले आहे.हैदराबादच्या जागेसंदर्भात बोलायचे झाल्यास, ही जागा गेल्या अनेक वर्षांपासून एआयएमआयएम कडेच आहे.

हा त्यांचा गड मानला जातो. मात्र, २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ओवेसी यांच्या पक्षाला चांगली टक्कर दिली होती. १९८४ मध्ये, सुल्तान सलाहुद्दीन ओवेसी यांनी एक स्वतंत्र उमेदवार म्हणून येथून विजय मिळवला होता. यानंतर त्यांनी १९८९ ते १९९९ पर्यंत -खचखच् चा उमेदवार म्हणून हैदराबादमधून विजय मिळवला होता. त्यांच्यानंतर,असदुद्दीन ओवेसीयांचा २००४ पासून या जागेवर कब्जा आहे. २०१९ मध्ये, १४ उमेदवारांनी ओवेसी यांच्या विरोधात निवडणूक लढली होती.

या निवडणुकीत ओवेसी यांना एकूण ५८.९४% मतं मिळाली होती. यावेळच्या लोकसभा निवडणुकीत भाजपने माधवी लता यांना उमेदवारी दिली आहे, बीआरएसने गद्दाम श्रीनिवास यादव यांना मैदानात उतरवले आहे. तर काँग्रेसने आपल्या उमेदवाराची घोषणा अद्याप केलेली नाही.

# २३८ वेळा पराभूत झाल्यावरही पुन्हा निवडणूक लढवण्यास तयार



तामिळनाडूच्या पद्मराजन यांनी तब्बल २३८ वेळा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही पुन्हा एकदा लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे.

६५ वर्षीय पद्मराजन हे एका टायर रिपेअर शॉपचे मालक आहेत. त्यांनी १९८८ मध्ये तामिळनाडूमधील मेत्तूर येथून निवडणूक लढवण्यास सुरुवात केली. जेव्हा त्यांनी निवडणूक लढवणार असल्याचं सांगितले तेव्हा लोक त्यांची खिल्ली उडवायचे पण एक सामान्य माणूसही निवडणुकीत भाग घेऊ शकतो हे त्यांना सर्वांना दाखवून द्यायचं होतं.वी लूपद्मराजन म्हणाले की, सर्व उमेदवारांना फक्त निवडणुकीत जिंकायचं असतं पण माझ्याबाबतीत तसं नाही. केवळ निवडणुकीत भाग घेतल्याने मला आनंद होतो आणि आपण जिंकलो किंवा हरलो याने काही फरक पडत नाही. पराभूत होऊनही आनंदी आहे. ते आताही तामिळनाडूच्या धर्मपुरी जिल्ह्यातून निवडणूक लढवत आहेत.

इलेक्शन किंग म्हणून प्रसिद्ध असलेले पद्मराजन यांनी देशभरात झालेल्या राष्ट्रपतीपदापासून ते स्थानिक निवडणुकांमध्ये भाग घेतला आहे.जिंकणं ही दुसरी गोष्ट

### लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

आहे. मी निवडणुकीत कोणाच्या विरोधात उभा आहे, यानेही मला काही फरक पडत नाही असंही त्यांनी म्हटलं आहे. मात्र, निवडणूक लढवणे त्यांच्यासाठी अजिबात सोपं राहिलेलं नाही. गेल्या अनेक वर्षांत निवडणुकांवर लाखो रुपये खर्च केले आहेत. भारतातील सर्वात अयशस्वी उमेदवार म्हणून लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान मिळवलं आहे.मला एकाही मताची आशा नव्हती पण तरीही लोकांनी माझ्यासाठी मतदान केलं, मला स्वीकारलं. लोकं आपला उमेदवारी अर्ज दाखल करताना संकोच करतात, म्हणूनच मला त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी एक रोल मॉडल बनायचं आहे. मी शेवटच्या श्वासापर्यंत निवडणूक लढवत राहीन पण कोणतीही निवडणूक जिंकलो तर मलाच आश्चर्य वाटेल असं पद्मराजन यांनी म्हटलं आहे.

# केट मिडलटनला कॅन्सर; पण लोकांत चर्चा पूर्वेतिहासाची

ब्रिटिश राजघराणं सध्या बिकट अवस्थेतून जात आहे. दोन महिन्यांपूर्वीच किंग चार्ल्स यांना कॅन्सर झाल्याची बातमी आली आणि त्यांच्या चाहत्यांना धक्का बसला. राजघराणंही त्यामुळे चिंतित होतं. या घटनेमुळे निर्माण झालेली चिंता आणि त्यासंदर्भातल्या बातम्या थोड्या विरत नाहीत, तोच पुन्हा एक तशीच बातमी आली. प्रिन्स विल्यम यांची पत्नी प्रिन्सेस ऑफ वेल्स केट मिडलटन यांनाही कॅन्सर झाल्याच्या बातमीने स्वत: केट यांच्यासह अनेकांना धक्का बसला. स्वत: केट यांनीच ही बातमी माध्यमांना दिली. जानेवारी २०२४मध्ये केट यांच्यावर पोटाची शस्त्रक्रिया झाली होती. दोन आठवडे त्या हॉस्पिटलमध्ये होत्या. त्यानंतर त्या कुठल्याही कार्यक्रमात किंवा सार्वजनिक व्यासपीठावर दिसल्या नव्हत्या.

सार्वजनिक जीवनातून त्या एकदम गायब का झाल्या, याविषयी दबक्या आवाजात चर्चा सुरू झाली होती, त्यांच्या तब्येतीवरूनही अनेक प्रश्न विचारले जात होते आणि त्यानंतर थेट त्यांना कॅन्सर झाल्याची बातमीच जाहीर झाली. केट यांच्या पोटावर शस्त्रक्रिया झाल्यापासून बकिंगहॅम पॅलेसच्या



आपल्या ऑफिशिअल ड्युटीवर त्या दिसल्या नव्हत्या. केट कुठेच दिसत नाहीत म्हटल्यावर सोशल मीडियावर 'व्हेअर इज केट' हा हॅशटॅगही ट्रेंड व्हायला लागला होता.ब्रिटिश राजघराणं असंही कायम जगभरात चर्चेत असतं. या राजघराण्यात कुठे, काय चालू आहे, याबाबत अख्ख्या जगालाच कायम उत्कंठा असते. आता तर राजघराण्यातील एकदम दोन जणांना कॅन्सर झाल्याच्या चर्चेनं हे घराणं आणि त्यांचे सदस्य पुन्हा एकदा लोकांच्या चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. त्यात सध्या केट आघाडीवर आहेत. त्यांच्याविषयीचे किस्से, कहाण्या आणि वाद पुन्हा सोशल मीडियावर झळकू लागले आहेत.

ब्रिटनच्या शाही परिवाराच्या अतिशय जवळचे मानले जाणारे टॉम क्विन यांनी 'गिल्डेड यूथ : एन इंटिमेट हिस्ट्री ऑफ ग्रोइंग अप इन द रॉयल फॅमिली' नावाचं एक पुस्तक लिहिलं. काही महिन्यांपूर्वीच ते प्रकाशित झालं. त्यात त्यांनी दावा केला आहे की प्रिन्सेस डायना यांची सून केट मिडलटन शाही राजघराण्यात लग्न करीत असल्यामुळे लग्नापूर्वी म्हणजे २०११ मध्ये त्यांना 'फर्टिलिटी टेस्ट' म्हणजे त्या आई होऊ शकतील की नाही, याबद्दलची मेडिकल टेस्ट द्यावी लागली होती. केट शाही परिवारातील नसल्यामुळेच त्यांना या 'परीक्षे'ला सामोरं जावं लागलं होतं. या पुस्तकात प्रिन्सेस डायना आणि केट मिडलटन यांच्यावर एक स्वतंत्र प्रकरणच आहे. त्यात त्यांनी म्हटलं आहे, १९८१ मध्ये ज्यावेळी प्रिन्स चार्ल्स आणि डायना यांचा विवाह झाला, त्यावेळी डायना यांनाही अशाच प्रकारची फर्टिलिटी टेस्ट द्यावी लागली होती. त्याचंही कारण हेच. त्या शाही राजघराण्यातल्या नव्हत्या! या पुस्तकावरून आणि राजघराण्यातल्या नसल्यामुळे डायना आणि केट या दोघी सासू-सुनांना फर्टिलिटी टेस्ट द्याव्या लागल्याच्या मुद्द्यावरून सध्या ब्रिटनमध्ये चर्चेला तोंड फुटलं आहे.एखादी गोष्ट चर्चेत असली की मग त्यासंदर्भात इतरही गोष्टींच्या बाबतीत शिळ्या कढीला ऊत आणला जातो. केट यांच्याबाबत दुसरी एक घटना घडली होती ती २०१२मध्ये. पण, त्यावरूनही सध्या सोशल मीडियावर मोहोळ उठलं आहे. प्रिन्स विल्यम यांची पत्नी केट मिडलटन यांचा एक टॉपलेस फोटो एका फ्रेंच मासिकात छापून आला होता. शाही परिवार त्यामुळे खूपच नाराज झाला होता. खुद्द प्रिन्स विल्यम यांनीही या घटनेचं वर्णन त्यावेळी 'दु:खद' असं केलं होतं. याच प्रकरणावरून त्या मासिकाशी संबंधित सहा जणांवर त्यावेळी खटलाही भरण्यात आला होता. केटच्या तोटक्या कपड्यांचा वादही वेळोवेळी ब्रिटनमध्ये चर्चेचा मुद्दा बनला होता आणि मीडियानंही त्यावेळी राजघराण्याचं वाभाडं काढलं होतं.

पण, राजघराण्यानं त्यावेळी गप्प बसणंच पसंत केलं होतं. त्यांच्याबाबतीत अलीकडचा आणखी एक किस्सा आहे. प्रिन्स विल्यम आणि केट २०२२मध्ये कॅरेबियन देशांच्या टुरवर गेले होते. तिथल्या फुटबॉलच्या ग्राउंडवर शाही हेलिकॉप्टर लँड करण्यात आल्यानं गावकरी आणि गावातले तरुण नाराज झाले होते. लोकांनी याचा निषेध तर केलाच, पण गावात लगोलग पोस्टर लागले, 'ही जागा रॉयल फॅमिलीची नाही, मुलांचं मैदान खराब करण्याचा शाही राजघराण्याला कोणताही अधिकार नाही!'आमचं आम्हाला लढू द्या!

केट मिडलटन आणि किंग चार्ल्स यांच्या कॅन्सरच्या निमित्तानं अनेक नव्या - जुन्या घटनांना लोक उजाळा देताहेत. पण, या घराण्याविषयी लोकांना तितकंच प्रेमही आहे. त्यामुळे त्यांच्या तब्येतीविषयी लोकही तितकेच चिंतित आहेत आणि ते लवकर बरे होवोत, अशी प्रार्थना करीत आहे. खुद्द केट आणि किंग चार्ल्स यांनी याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटलं आहे, 'खूप आभार, पण या कठीण काळाचा सामना आमचा आम्हाला करू द्या!

# इतरांना धमकावणे काँग्रेसची जुनी संस्कृती



## ६०० वकिलांच्या पत्रावर पंतप्रधान मोदींचा पलटवार

लोकसभा निवडणूक अवघा काही दिवसांवर येऊन ठेपली आहे, त्यामुळेच देशातील राजकीय वाचावरण चांगलेच तापले आहे. अशातच, ज्येष्ठ वकील हरीश साळवे आणि 'बार काउंसिल ऑफ इंडिया'चे अध्यक्ष मनन कुमार मिश्रा यांच्यासह देशातील ६०० हून अधिक वकिलांनीसर्वोच्च न्यायालयाचेसरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांना एक पत्र लिहिले आहे. एक विशेष गट देशातील न्यायव्यवस्था कमकुवत करण्यात गुंतला असल्याचे या पत्रात म्हटले. आता यावरुन पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे.

६०० हून अधिक वकिलांनी उगख ला लिहिलेल्या पत्रात म्हटले की, 'एक विशेष गट देशातील न्यायव्यवस्था कमकुवत करण्याचे काम करत आहे. राजकीय प्रकरणांमध्ये, विशेषत: राजकारण्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या प्रकरणांमध्ये दबाव आणला जातोय. हे आपल्या देशाच्या न्यायपालिकेसाठी हानिकारक आणि आपल्या लोकशाहीसाठी धोका आहे. हा विशेष गट न्यायाधीशांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतो.

हा गट एखाद्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करतो आणि नंतर त्याचाच बचाव करतो. हा गट न्यायालयाच्या चांगल्या भूतकाळाच्या आणि सुवर्णकाळाच्या खोट्या कथा रचतो आणि वर्तमानात घडणाऱ्या घटनांशी तुलना करतो. त्यांच्या टिप्पण्यांचा उद्देश न्यायालयांवर प्रभाव पाडणे आणि राजकीय फायद्यासाठी त्यांना अस्वस्थ करणे हा आहे. निर्णय त्यांच्या बाजूने आला नाही, तर न्यायालयावर टीका केली जाते' असा दावा या पत्रात करण्यात आला आहे.

या पत्रानंतर पंतप्रधाननरेंद्र मोदीयांनी काँग्रेसवर निशाणा साधला. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर पोस्ट केले की, 'दुसऱ्यांना भीती घालणे आणि धमकावणे, ही काँग्रेसची जुनी संस्कृती आहे. ५ दशकांपूर्वी त्यांनी प्रतिबद्ध न्यायपालिकेची मागणी केली होती. ते निर्लज्जपणे स्वत: च्या स्वार्थासाठी इतरांकडून वचनबद्धता घेतात, देशाप्रती कोणतीही वचनबद्धता ठेवत नाहीत. १४० कोटी भारतीय त्यांना नाकारत आहेत, यात काहीच आश्चर्य नाही,' अशी टीका पीएम मोदी यांनी केली.

# माजी मुख्यमंत्र्यांचे सुपुत्र नकुल नाथ काँग्रेसकडून लोकसभेच्या मैदानात



**भोपाळ :** देशातील लोकसभा निवडणुकांसाठी भाजपाप्रणित एनडीए आणिकाँग्रेससहइंडिया आघाडीने रणशिंग फुंकले आहे.काँग्रेस, भाजपासह इतरही प्रादेशिक पक्षांच्यावतीने निवडणुकांसाठी उमेदवारांच्या नावांची घोषणा होत आहे. तर, पहिल्या टप्प्यात जिथं मतदान होत आहे, त्याठिकाणी उमेदवारांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत आहे. महाराष्ट्रातील विदर्भात पहिल्या टप्प्यात मतदान होत आहे. त्यामुळे, नितीन गडकरींसह विदर्भातील बड्या नेत्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.मध्य प्रदेशातमाजी मुख्यमंत्री कमलनाथ यांचे सुपुत्र नकुल नाथ यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला.

मध्य प्रदेशच्या छिंदवाडा लोकसभा मतदारसंघातून नकुल नाथ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे, अर्जासोबत त्यांनी वैयक्तिक माहितीसह पार्श्वभूमी आणि संपत्तीचं विवरणही जोडलं आहे. त्यानुसार, त्यांच्याकडे ७०० कोटींची संपत्ती आहे. नुकल नाथ यांच्या संपत्तीत गेल्या ५ वर्षांच्या तुलनेत ४० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. रोकड, शेअर्स आणि बाँडसह ६४९.५१ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता असल्याचं त्यांनी जाहीर केलं आहे. तर, ४८.०८ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता नकुल नाथ यांनी निवडणूक आयोगाकडील विवरण पत्रात घोषित केली आहे.मध्य प्रदेशातील प्रभावी काँग्रेस नेते म्हणून कमलनाथ यांच्याकडे पाहिले जाते. कलमनाथ यांचे सुपुत्र हे गत २०१९ च्या निवडणुकीत ४७५ करोडपती खासदारांच्या यादीत अव्वल स्थानावर होते. एडीआर म्हणजेच असोसिएशन ऑफ डेमोक्रेटीक रिफॉर्म्सच्या आकडेवारीनुसार नकुल नाथ यांनी २०१९ मध्ये ६६० कोटी रुपयांची संपत्ती जाहीर केली होती. त्यावेळीही, त्यांनी छिंदवाडा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. विशेष म्हणजे राज्यातून निवडून आलेले एकमेव खासदार नकुल नाथ ठरले होते.माजी मुख्यमंत्री कमल नाथ हे नेहमी विमानाने प्रवास करतात, गत विधानसभा निवडणुकांच्या संपत्ती विवरण पत्रानुसार त्यांची संपत्ती १३४ कोटी एवढी आहे. त्यामुळे, वडिलांपेक्षा मुलाची संपत्ती ५ पटीने अधिक आहे. विशेष म्हणजे कमलनाथ यांनी याच छिंदवाडा मतदारसंघातून ९ वेळा विजय मिळवला आहे. तर, त्यांच्या मुलाने गतवर्षी पहिल्यांदाच येथून खासदारकी मिळवली. आता, नकुल नाथ यांना भाजपाच्या विवेक साहू यांचे आव्हान असणार आहे.

# सीता सोरेन यांचे JMM वर गंभीर आरोप



झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या वहिनी सीता सोरेन यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. दुमका मतदारसंघातून उमेदवार घोषित झाल्यानंतर त्या रांची येथील भाजपा् मुख्यालयात पोहोचल्या. पत्रकारांना संबोधित करताना त्यांनी गचच् वर गंभीर आरोप केले आहेत. झारखंड मुक्ती मोर्चा (गचच्)आपल्या तत्त्वांपासून दूर गेला आहे आणि भ्रष्टाचारात गुंतला आहे. झारखंडचा विकास केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारसरणीमुळेच शक्य आहे असं म्हटलं आहे.

सीता सोरेन यांनी दावा केला की, भाजपा झारखंडमधील सर्व १४ लोकसभेच्या जागा जिंकेल आणि 'अबकी बार ४०० पार'चं लक्ष्य पूर्ण होईल. सीता सोरेन यांनी १९ मार्च रोजी भाजपामध्ये प्रवेश केला होता. माझे पती दुर्गा सोरेन जोपर्यंत पक्षात होते, तोपर्यंत गचच् योग्य दिशेने जात होता, पण आता गचच् आपल्या तत्त्वांपासून आणि धोरणांपासून दूर गेले आहे. गचच् आता दलालांच्या हाती असून भ्रष्टाचारात गुंतला आहे.

माझ्या पतीने झारखंड आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली होती, परंतु त्यांना योग्य सन्मान दिला गेला नाही. माझ्या पतीचा मृत्यू अजूनही आमच्यासाठी एक गूढ आहे. मी त्यांच्या मृत्यूची सतत चौकशी करण्याची मागणी केली होती परंतु त्याकडे लक्ष दिले गेले नाही. भाजपाने आता मोठी जबाबदारी दिली आहे असं सीता सोरेन यांनी म्हटलं आहे.

मला पक्षात सहभागी करून संधी दिल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा आणि गृहमंत्री अमित शाह यांचे आभार मानते.

# भारतातील कांदा निर्यातबंदीचा फटका परकीय देशांनाही

कांद्याच्या बाबतीत केंद्र सरकारनं मोठा निर्णय घेतलाय. कांद्यावरील निर्यातबंदी ३१ मार्चनंतरही कायम राहणार असल्याचं सरकारनं सांगितलंय. पुढील आदेश येईपर्यंत अनिश्चित काळासाठी ही निर्यातबंदी कायम असणार आहे. दरम्यान, एकीकडे या निर्यातबंदीचा देशात कांद्याच्या दरावर परिणाम झालाय. कांद्याचे दर कमी झालेत. तर दुसरीकडं इतर देशांवर देखील कांदा निर्यातबंदीचा परिणाम झालाय. या निर्यातबंदीमुळं काही देशांमध्ये कांद्याचे दर वाढण्याची शक्यता आहे.

कांद्यावर निर्यातबंदी घातल्यापासून देशात कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली. शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसलाय. ८ डिसेंबर २०२३ पासून सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. ही बंदी ३१ मार्चपर्यंत राहणार असल्याचं सरकारनं सांगितलं होतं. पण



आता ही निर्यातबंदी पुढील आदेश येईपर्यंत कायम राहणार असल्याचे सरकारनं सांगितले आहे. त्यामुळं शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतलाय. निर्यातबंदीचा निर्णय तातडीनं मागे घ्यावा अशी मागणी शेतकरी करत आहेत. दरम्यान, सरकारच्या या निर्णयाचा फटका अनेक देशांना देखील बसू शकतो. त्यांच्या बाजारपेठेत कांद्याच्या दर वाढण्याची शक्यता आहे. जाणून घेऊयात याबाबतची सविस्तर माहिती.

दरम्यान, भारत हा कांद्याचा मोठा निर्यातदार देश आहे. देशातून मोठ्या प्रमाणावर इतर देशांमध्ये कांद्याची निर्यात केली जाते. अनेक देश कांद्याच्या बाबतीत भारतावर अवलंबून आहेत. पण सरकारनं निर्यातबंदी केल्यामुळं त्या देशांमध्ये कांद्याचा तुटवडा भासत आहे. भारताकडून बांगलादेश, नेपाळ, ण-ए, मलेशिया हे देश मोठ्या प्रमाणात कांद्याची खरेदी करतात. पण भारताना कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळं या देशांमध्ये कांद्याचे दर वाढण्याची शक्यचता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर कांदा निर्यातबंदीच्या निर्णयानंतर दरात मोठी घसरण झाली आहे. ४००० ते ४५०० रुपये प्रति क्विंटलने जाणारा कांदा सध्या १००० ते १२०० रुपये प्रतिक्विंटलवर आला आहे. त्यामुळं सरकारनं घेतलेल्या कांदा निर्यातबंदीचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. दरम्यान, ३१ मार्चनंतर तरी सरकार कांद्यावरील निर्यातबंदी उठवेल अशी शक्यता होती. मात्र, ही शक्यता आता मावळली आहे.

## नेतृत्वाविरोधात टीका किती सहन करायची याला मर्यादा', वरुण सरदेसाईंनी सुनावले, मविआतील वाद वाढणार ?



सांगलीच्या जागेवरून आक्रमक भूमिका घेतलेले काँग्रेसचे नेते ठाकरे गटावर टीका करत आहेत. त्या पार्श्वभूमीवरवरुण सरदेसाई यांनी विश्वजित कदम यांच्यासह काँग्रेसच्या नेत्यांना इशारा दिला आहे. सांगलीच्या जागेसाठी विश्वजित कदम आणि सतेज पाटील यांच्यासह स्थानिक नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतलेली आहे. त्याला प्रत्युत्तर देतानावरुण सरदेसाई म्हणाले की, मला जेवढी कल्पना आहे त्यानुसार विश्वजित कदम आणि सतेज पाटील हे वाटाघाटीच्या बैठकीला उपस्थित नव्हते. त्यामुळे त्यांना कदाचित अपुरी माहिती असेल. कोल्हापूरची जागा वर्षांनुवर्षे शिवसेनेच्या हक्काची जागा होती. २०१९ मध्येही आम्ही येथून विजय मिळवला होता. यावेळी स्वत: शाहू महाराज छत्रपती हे तिथून लढत असल्याने आम्ही कोल्हापूरऐवजी सांगलीची जागा घेतली.